# पंढरी संचार

● पंढरपूर ● रविवार, २९ डिसेंबर २०२४
● किंमत ₹ ४ ● पाने : ८

NO PAIDNEWS NEWSPAPER

pandharisanchar.com RNI-MAH-MAR/1499/2000 ● वर्ष २९ ● अंक - २१९




आर्थिक स्थिरतेचा वाटाड्या डॉ. मनमोहन सिंगजी ! PII



पांडुरंग परिवाराचे युवक नेते प्रणव परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त.... PIII

## मागेल त्याला सौर पंप योजना

# आठ महिन्यात 1 लाख 58 हजार पंपाचे वाटप



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** शेतीसाठी शासनाने दिवसा वीजपुरवठा करावा अशी मागणी शेतकऱ्यातून होत होती. याची दखल घेऊन शासनाने शेतकऱ्यांना सौर कृषी पंप देण्याचा निर्णय घेतला. यासाठी मागील त्याला सौरपंप योजना सुरू केली. या योजनेस चांगला प्रतिसाद मिळाला असून आठ महिन्यात १ लाख ५८ हजार सौर पंप शेतकऱ्यांना देण्यात आले आहेत यामुळे शेतकऱ्यातून आनंद व्यक्त होत आहे .

राज्यात विजेचा तुटवडा असल्यामुळे शेतीसाठी रात्री वीज पुरवठा करण्यात येत होता. शेतीला रात्र पाणी देण्यासाठी गेल्यानंतर शेतकऱ्यांना धोका निर्माण होत होता. यामुळे शेतकऱ्यांनी शासनाने शेतीला दिवसा विज पुरवठा करावा अशी मागणी होत होती. याची दखल घेऊन शासनाने शेतकऱ्यांना सौर कृषी पंप देण्याचा निर्णय घेतला. यासाठी 2024 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात यासाठी कोट्यावधी रुपयाची तरतूद करण्यात आली. 10 लाख 50 हजार कृषी पंप देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. शासनाने मागील त्याला सौर पंप योजना जाहीर केली. या योजनेस शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. मार्च 2024 ते डिसेंबर 2024 या कालावधीमध्ये १ लाख ५८ हजार सौर कृषी पंपाचे वाटप करण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांनी शेतीला दिवसा पाणीपुरवठा करण्यास सुरुवात केली आहे. मागील त्याला सौर पंप योजनेअंतर्गत केंद्र सरकार 30 % राज्य शासन 60 टक्के अनुदान देत होते. तर शेतकऱ्यांना दहा टक्के रक्कम भरावी लागत होती. शेतकऱ्यांना कमी रक्कम भरावी लागत असल्याने शेतकऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला असल्याचे दिसून आले आहे. सन 2015 ते 2023 या कालावधीत राज्यात विविध योजनेतून एक लाख 80 हजार सौर कृषी पंप बसविण्यात आले आहे. तर मार्च 2024 ते डिसेंबर 2024 या आठ महिन्याच्या कालावधीत एक लाख 58 हजार कृषी पंप बसविण्यात आले आहेत असे एकूण राज्यात तीन लाख तीस हजार कृषी पंप बसविण्यात आले आहेत. सौर कृषी पंप योजना सुरू झाल्यामुळे आता विजेची मागणी कमी होणार आहे.

## » At a Glance

### शेख नागनाथ केसरी कुस्तीचा ठरला मानकरी



**मोहोळ :** प्रेक्षकांनी खचाखच भरलेले मैदान, प्रचंड उत्कंठा, टाळ्या अन् हलग्यांच्या आवाजाने गजबजलेल्या श्री नागनाथ केसरी कुस्ती समितीच्या आखाड्यात प्रथम क्रमांकाची कुस्ती मोहोळ येथील महाराष्ट्र केसरी पै. सिकंदर शेख व भारत केसरी हरियाणाचा पै. भोला पंजाबी यांच्यात झाली. बॅकथ्रो डावावर सिकंदर शेख याने भोला पंजाबी याला आसमान दाखवत बक्षिस पटकाविले.

### वृद्धाने केला पाचवीतील अल्पवयीन मुलीचा विनयभंग



**सोलापूर :** आई-वडील बाहेर गेल्याची संधी साधून घरी आलेल्या दोन लहान मुलींना खाऊचे पैसे देऊन बाहेर पाठवले व एका वृद्धाने पाचवीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीचा नको त्या ठिकाणी हात लावून विनयभंग केला. ही घटना २२ डिसेंबर रोजी दुपारी २ च्या सुमारास घडली आहे. याबाबत पीडित मुलीच्या आईने फिर्याद दिली असून, पोलिसांनी सुभाष जगधने (वय ६५) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २०२३ अन्वये गुन्हा दाखल केला.

### पैशाच्या कारणावरून युवकाची आत्महत्या



**माढा :** माझे घेतलेले पैसे मला मोबाइलवर फोन करून वारंवार त्रास दिल्याच्या कारणावरून एका युवकाने लिंबाच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. महादेववाडी (ता. माढा) येथील माणिक एकनाथ दिवे यांचे शेतात घडली. अभिजित दिलीप दिवे (वय २५, रा महादेववाडी, ता. माढा) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे.

### संगमेश्वर नगरात दागिन्यांची चोरी



**अक्कलकोट :** अक्कलकोट रोडवरील संगमेश्वर नगरात सेफ्टी डोअरचा कडी कोयंडा उचकटून 10. 2 ग्रॅम वजनाचे दागिने चोरून नेले. हा प्रकार 25 डिसेंबर रोजी रात्री 9. 30 ते 26 डिसेंबरच्या सकाळी 11 वाजण्याच्या दरम्यान घडला. स्टिपन सुनील पवार ( वय 34, रा. सध्या हिरा हाईट्स, सदर बझार सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या चोरीच्या घटनेत सुमारे एक लाख तीस हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास झाला आहे. या घटनेचा तपास सहायक पोलीस निरीक्षक चंदनशिवे करीत आहेत.

### सन २०२५ वर्षातील स्थानिक सुट्या जाहीर

**सोलापूर :** सन २०२५ या वर्षातील स्थानिक सुट्या जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जाहीर केल्या आहेत. सन २०२५ या वर्षात तीन स्थानिक सुट्या देण्यात आल्या आहेत. यामध्ये मंगळवार दि. 14 जानेवारी 2025 रोजी मकरसंक्रात, सोमवार दि. 22 सप्टेंबर 2025 रोजी घटस्थापना, सोमवार दि. 20 ऑक्टोबर 2025 रोजी नरक चतुर्दशी, या सुट्यांचा समावेश आहे.

## पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या 33 शाळात सीसीटीव्ही कॅमेरे बसणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थिनी वर अनुचित प्रकार घडू नयेत यासाठी शिक्षण विभाग सतर्क झाला असून जिल्हा परिषदेच्या 2777 शाळा वर्षभरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यात 394 शाळात कॅमेरे बसविण्यास सुरुवात करण्यात आली आहे. यात पंढरपूर तालुक्यातील 33 शाळात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत . जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये अनुचित प्रकार घडू नयेत विद्यार्थ्यांवर करडी नजर राहावी म्हणून जिल्हा नियोजन समितीने शाळेमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी ३ कोटी 10 लाख रुपयाचा निधी मंजूर केला आहे.यातून पहिल्या टप्प्यात 394 शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. वर्षभरात जिल्हा परिषदेच्या संपूर्ण 2777 शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. यामुळे शाळांमधील शिक्षक व विद्यार्थ्यांवर करडी नजर राहणार आहे. जिल्हा परिषद शाळामध्ये शिक्षक व विद्यार्थी अनेक वेळा शाळेत दांडी मारतात अशी चर्चा आहे. यामुळे दांडी मारण्याचे प्रमाण



देखील कमी होणार आहे व अनुचित घटनावर पायबंध बसणार आहे. पंढरपूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या 33 शाळांमध्ये पहिल्या टप्प्यात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे पालकातून समाधान व्यक्त होत आहे.



### जानेवारीपासून बोटिंग सुरु होणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी असणाऱ्या उजनी धरणात आता नवीन वर्षापासून बोटिंगची सुविधा उपलब्ध होणार असून एक अध्यायावत पर्यटन स्थळ बनवण्याची तयारी सुरू झाली आहे. उजनी धरण हे सोलापूर जिल्ह्यासह पुणे आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांची तहान भागवण्याचे काम करत असते. याशिवाय या विभागाला समृद्ध करण्याचे कामही उजनी धरणाने केले आहे.

## कलाकार प्राजक्ता माळी हिचा वेदना हुंकार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गेली महिनाभर माझ्या नावाने सोशल मीडियामध्ये जी चिखल फेक सुरू आहे ती या महाराष्ट्राला शोभणारी नाही कोणीतरी राजकीय व्यक्तीने बोलायचे आणि समाज माध्यमांवर ते नाव घेऊन अक्षरशः अब्रूचे धिंडवडे काढायचे हे योग्य नाही माध्यमांनी देखील भान ठेवले पाहिजे अशा शब्दात प्राजक्ता माळी यांनी आपला वेदना हुंकार व्यक्त केला.

मुंबई मराठी पत्रकार संघात त्यांनी पत्रकार परिषद घेऊन सुरेश धस यांच्या वक्तव्याचा निषेध केला.

परळी बीड येथील सांस्कृतिक कार्यक्रमात धनंजय मुंडे यांची भेट झाली . ती एकमेव भेट होती त्यावेळी काही क्षण त्यांच्यासोबत मी व्यासपीठावर होते त्यांच्याबद्दल दोन शब्द बोलले



त्या पलीकडे आमच्या संबंध कधी आला नाही परंतु सुरेश धस यांनी कुठलाही विचार न करता थेटपणाने माझे नाव घेणे आणि त्यानंतर माध्यमाने त्याच्यावरती आकारण चर्चा करणे लोकांच्या प्रतिक्रिया विचारणे हे अत्यंत वेदनादायी आहे. » पान ३ वर

## पंढरपुरात प्लॅस्टिक कॅरी-बॅगचा वापर; नगरपरिषदेचे दुर्लक्ष

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** शासनाने 75 मायक्रो पेक्षा कमी जाडी असलेल्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर करण्यास बंदी घातली आहे. याची विक्री व वापर करणाऱ्या वर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र पंढरपूर शहरात प्लॅस्टिक कॅरीबॅगचा सर्रास वापर करण्यात येत आहे. याकडे नगर परिषदेचे दुर्लक्ष आहे. यामुळे पर्यावरण व नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. 50 मायक्रो पेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टिक पिशव्या वापर केल्यास पर्यावरण व मानवी आरोग्यास त्या हानिकारक आहेत. कॅरीबॅगचा वापर केल्यावर प्लॅस्टिकचे कण नागरिकांच्या शरीरात गेल्यास कॅन्सरसारखा आजार होऊ शकतो. तसेच अनेक नागरिक प्लॅस्टिक कॅरीबॅगमध्ये अन्नपदार्थ घालून



ते रस्त्यावर टाकतात. यामुळे हे पदार्थ जनावरे खातात. यामुळे त्यांच्या शरीरात प्लॅस्टिक कॅरीबॅगचे तुकडे जातात. यामुळे जनावरांना धोका निर्माण झाला आहे. याची दखल घेऊन शासनाने 75 मायक्रो पेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टिक पिशवी विक्री व वापर करणाऱ्या वर कारवाई करण्याचे आदेश नगरपरिषदांना दिले आहेत. पंढरपूर नगरपरिषदेने सुरुवातीला अनेक व्यापाऱ्यावर कारवाई करून मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिक कॅरीबॅग जप्त केल्या तर » पान ३ वर

### कल्पकता पुढे आणणे हाच संशोधन महोत्सवाचा उद्देश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** दैनंदिन मुलभूत गरजा आणि वारंवार येणाऱ्या समस्यांवर शाश्वत उपाय शोधणे म्हणजेच वैज्ञानिक संशोधन म्हणता येईल. विद्यापीठ आणि महाविद्यालयस्तरावर आयोजित अशा संशोधन महोत्सवातून विद्यार्थ्यांच्या नवनव्या कल्पनांचा आविष्कार होत असतो. सर्वसमावेशक समस्या निवारणाची कल्पकता पुढे आणणे हाच या संशोधन महोत्सवाचा उद्देश असल्याची भूमिका पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रकाश महानवर यांनी मांडली. वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी मध्ये आयोजित संशोधन महोत्सवात कुलगुरू बोलत होते.


## वाचकांसाठी सुवर्णसंधी !!!

सादर करीत आहे एक आकर्षक योजना ३९९ रु. मध्ये सहा महिने घरपोच अंक

' दै.पंढरी संचार '

आजच आपला अंक विक्रेत्यांकडे बुक करा अथवा कार्यालयाशी संपर्क साधा.

- संपर्क -

रविकिरण पाटील - ८२०८९४२३४६

दत्तात्रय बनसोडे - ९८९०९७६४७५

बुकिंग मर्यादा २८ डिसेंबरपर्यंत.


## अनुचित प्रकार घडू नये म्हणून

# ३१ डिसेंबर रोजी पोलिसांची करडी नजर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व नवीन वर्षाचे स्वागत तरुणाई जल्लोषाने करते.यावेळी मद्याचा व इतर अमली पदार्थांचा वापर केला जातो. यामुळे अनुचित प्रकार घडण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर पंढरपूर शहर पोलिस 31 डिसेंबर रोजी शहरात चोख बंदोबस्त ठेवून करडी नजर ठेवण्यात येणार आहे.

सरत्या वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागत करण्याचा नवीन फंडा गेल्या दहा वर्षापासून सुरू झाला आहे. यामुळे तरुणाई मोठ्या उत्साहात नवीन वर्षाचे स्वागत करते. यासाठी काही तरुणाई मद्य प्राशन करते तर काहीजण अमली पदार्थांचा वापर करतात. मद्य प्राशन करून वेगाने वाहने चालविली जातात.



यामुळे इतर नागरिकांना धोका निर्माण होतो. म्हणून 31 डिसेंबर रोजी तरुणाईकडून मद्याचा वापर होऊ नये व वेगाने वाहने चालविली जाऊ नयेत. यासाठी पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके पंढरपूर शहरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवणार आहेत. शहरात येणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात येणार आहे. तसेच वाहन चालविणाऱ्या चालकांची मद्य तपासणी करण्यात येणार आहे. ड्रिंक अँड ड्राईव्ह करणाऱ्या वर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. 31 डिसेंबर शांततेत पार पडावा यासाठी पोलिसांनी खबरदारी घेतली असल्याचे दिसून येत आहे. 31 डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर हॉटेल, ढाबा येथे तरुणाई मद्य प्राशन करते. मद्य प्राशन करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून परवाना घ्यावा लागतो. मात्र हा परवाना न घेता अनेकजण मद्य प्राशन करतात. यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाने खास पथक तयार केले असून हे पथक मद्य प्राशन करणाऱ्यांची तपासणी करणार आहे. त्यांच्याकडे परवाना नसेल तर कारवाई करण्यात येणार आहे. 31 डिसेंबर रोजी अवैद्य दारू विक्री होऊ नये याकडे उत्पादन शुल्क विभागाने लक्ष केंद्रित केले आहे.

**सोलापूर** : येडशी अभयारण्यातील वाघाच्या वास्तव्यासाठी प्रतिकूल परिस्थिती बघून त्याला सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात नेऊन सोडण्याची शिफारस व्याघ्र सनियंत्रण समितीने घेतली आहे. तशी शिफारस वरिष्ठ पातळीवर पाठविण्यात आली आहे. त्यानंतर या वाघाला नैसर्गिकपणे संचार करू द्यायचा की त्याला पकडून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात सोडायचे, याचा निर्णय राज्याचे मुख्य वन्यजीव रक्षक निर्णय घेणार आहेत.

### इस्लामपूरात मोठ्या थटामटात संपन्न झाला श्री सिद्धनाथ जोगेश्वरी मंदिराचा कलशारोहन

## सिद्धनाथाच्या नावाने चांगभलच्या जयघोषात,कलशावर केली पुष्पवृष्टी...

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस** : इस्लामपुर येथे श्री सिद्धनाथ जोगेश्वरी मंदिर जीर्णोद्धार मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळा मोठ्या धार्मिक उत्साहात संपन्न झाला. इस्लामपूर येथील सर्व ग्रामस्थ व माने देशमुख परिवार एकत्रित येत दि २४ डिसेंबर ते २६ डिसेंबर या तीन दिवसामध्ये विविध धार्मिक विधी सह श्री सिद्धनाथ जोगेश्वरीच्या नवीन मूर्तीची प्राण प्रतिष्ठा ,कलशारोहन करण्यात आले.या निमित्ताने ग्राम प्रदक्षिणा मिरवणूक,देवता स्थापना,मूर्ती व कलशाला जलाधिवास,धान्य दिवस,नवग्रह स्थपना, काकडा,प्रवचन,किर्तन,हारी जागर असे विविध धार्मिक विधी व कलाशारोहन ह.भ.प.रविंद्र महाराज सिद्धनाथ मठ म्हसवड यांच्या हस्ते संपन्न झाले.या कार्यक्रमास आमदार उत्तमराव जानकर,मा. पंचायत समिती उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील.सहकार महर्षी साखर कारखाना संचालिका स्वरूपाराणी जयसिंह मोहिते पाटील,संजय काका देशमुख नातेपुते,अमरभाऊ देशमुख वेळापूर,ह भ प धैर्यशील भाऊ देशमुख,मच्छिंद्र पवार, डॉ.रामदास देशमुख, गौतम माने, संग्रामसिंह रणनवरे, बाळासाहेब माने देशमुख, साहेबराव देशमुख, लक्ष्मण पवार, कुलदीप देशमुख पी एस आय , विठ्ठल नारायण पवार,रामचंद्र देशमुख,भानुदास पवार,रत्नशिव पवार,हनुमंत पवार,चंद्रकांत दाते काका,आनंद शेंडगे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या निमित्ताने मंदिरास आकर्षक फुलांनी सजविण्यात आले होते. धार्मिक विधीनंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आला यांचा हजारो भाविकांनी याचा आस्वाद घेतला. कार्यक्रमास गावतील माहेरवासनी भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.त्यांना गावच्या वतीने साडी देऊन सन्मान करण्यात आला.३० वर्षा नंतर गावामध्ये ग्राम दैवत व कुलस्वामिनी मंदिराचा कार्यक्रम



पार पडल्याने सर्वाच्या चेह-यावर आनंद ओसांडून वाहत होता.लहान पासून आबालवृद्ध पर्यंत सर्वांनी प्रत्येक कार्यक्रमात हिर हिरीने भाग घेतल्याने हा भला मोठा धार्मिक सोहळा यशस्वी पार पडला.

१९९४ साली मंदिराचा जीर्णोद्धार करण्याच ठरवल होत यासाठी तथकालीन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांनी दोन सभामंडप मंदिरास दिले.मात्र इतर मंदिर बांधकाम आडचण आल्या नंतर ते थांबल त्यानंतर २०23 साली माने देशमुख परिवार पुढाकार घेऊन सुमारे 31 लाख रुपये लोकवर्गणी जमा करून राहिलेलं कामकाज पूर्ण केल.१९९४ साली विदर्भ कोकण ग्रामीण बँक इस्लामपूर शाखेत ठेवलेलं मच्छिंद्र पवार व रामचंद्र देशमुख या दोघांच्या सयुक्त खात्यामध्ये 63 हजार रुपये ठेव ठेवली होती.त्याचे २०२४ साली 5 लाख 60 हजार रुपये मिळाल्याने हा कलशारोहन कार्यक्रम करण्यास मदत झाली. तसेच माने देशमुख व ग्रामस्थांनी सढळ हाताने आर्थिक मदत केल्याने संपूर्ण कार्यक्रमाच आर्थिक नियोजन पूर्ण झाल.कार्यक्रमाच्या प्रास्तविकात बोलताना धनंजय देशमुख यांनी मंदिराच्या उर्वरित विकास कामासाठी आमदार उत्तमराव जानकर व अर्जुनसिंह मोहिते पाटील यांचेकडे निधीची मागणी केली.यावेळी उपस्थित आमदार उत्तमराव जानकर व अर्जुनसिंह मोहिते पाटील यांनी निधी देण्याची ग्वाही दिली.

## सोने, ट्रॅक्टर चोरी करणारी टोळी जेरबंद



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला** : सांगोला पोलीस ठाणे हद्दीतील मंगल कार्यालय येथील सोने चोरी तसेच ट्रॅक्टर चोरी करणाऱ्या टोळीस जेरबंद करून 4 लाख 90 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती पोलीस निरीक्षक भीमराव खंणदाळे यांनी दिली. सांगोला पोलीस ठाणे हद्दीत सांगोला शहर व ग्रामीण भागातील चोरी घटनांना आळा घालण्यासाठी व गुन्हे उघडकीस आणण्याकरीता सांगोला पोलीस ठाण्याकडील तपास पथक हे मुक्ताई मंगल कार्यालय शिवणे (ता. सांगोला) येथे दाखल झाले. याबाबतचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## » Selected

### भिशीतील पैशाच्या वादातून पतीकडून पत्नीचा खून


**सोलापूर** : बार्शी तालुक्यात खुनाची मालिका सुरूच आहे. भोयरे येथे झालेल्या दुहेरी खुनाची घटना ताजी असतानाच शुक्रवारी (दि. 27) पुन्हा 'तुझ्या भिशी लावण्यामुळेच मी कर्जबाजारी झालो आहे, ' या कारणावरून चिडून खासगी शिकवणी घेणाऱ्या पतीने पत्नीला व मुलाला गाडीवर बसवून शेतात नेले. पत्नीचा ओढणीने गळा आवळून, चाकू, दगडाने मारहाण करत खून केला. मुलावरही चाकूने वार करून त्याला गंभीर जखमी केल्याचा प्रकार सकाळी पावणेसात वाजता नागोबाचीवाडी (ता. बार्शी) शिवारात घडला.

### मतदानरूपी मिळालेल्या दानाची उतराई करणार



**सोलापूर** : विधानसभा निवडणुकीत जनतेने भरघोस मतांनी निवडून देत आपल्यावरची जबाबदारी आणखी वाढवली आहे. जनतेने मतांच्या रूपाने दिलेल्या दानाची उतराई नक्की करणार आहे. दक्षिण सोलापूर मतदारसंघाला राज्यातील टॉपचा मतदारासंघ बनवणार असल्याचे प्रतिपादन आ. सुभाष देशमुख यांनी केले. विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर मतदार संघातील ग्रामस्थांशी जनसंवाद आणि आभार मानण्यासाठी माळकवठे (ता. द. सोलापूर) येथे आयोजित कार्यक्रमात आ. देशमुख बोलत होते. आ. देशमुख यांनी विविध गावांना भेट देत ग्रामस्थांशी संवाद साधला व त्यांचे आभार मानले.

### संमिश्र हवामान, द्राक्ष उत्पादकांची चिंता



**सोलापूर** : राज्यात सध्या काही जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरण आहे. तर कुठे हलक्या स्वरुपाच्या पावसाने हजेरी लावली आहे. पुढील आठवड्यातही पाऊस- थंडी असे संमिश्र हवामान राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. वर्षाखेरपर्यंत ढगाळ वातावरण तर नवीन वर्षाच्या सुरुवातीच्या दिवसांपासून काही दिवस थंडीची तीव्रता वाढणार असल्याचे सांगण्यात आले आहे. द्राक्षे व इतर पिकांच्या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांसाठी हे हवामान डोकेदुखी ठरू शकते.

## तीन बांगलादेशी नागरिकांना दहशतवाद विरोधी पथकाने छापा टाकून केली अटक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ** : राज्याचे मुख्यमंत्री तथागृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बांगलादेशातून आलेल्या आणि अवैधरित्या भारतात राहणाऱ्या घुसखोराविरुद्ध कडक कारवाई सुरू केल्याच्या पार्श्वभूमीवर चिंचोली औद्योगिक वसाहत (ता. मोहोळ) मध्ये वेगवेगळ्या कंपनीत काम करणाऱ्या तीन बांगलादेशी नागरिकांना दहशतवाद विरोधी पथकाने छापा टाकून अटक केली असून, त्यांना १ दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली असल्याची माहिती *मोहोळचे नूतन* पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांनी दिली. या संदर्भात मोहोळ पोलिसांकडून मिळालेल्या माहिती नुसार, सोलापूर येथील दहशतवाद विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक सिद्धार्थ कदम व त्यांचे सहकारी यांना चिंचोली औद्योगिक वसाहती येथे काही बांगलादेशीय कामगार अवैधरित्या राहत असल्याची माहिती मिळाली होती. त्याप्रमाणे कदम हे आपल्या सहकाऱ्यांसह तेथे येऊन थांबले होते. त्यावेळी मोहोळ पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक अंजना फाळके व त्यांच्या सहकाऱ्यांनी चिंचोली काटी व सावळेश्वर येथील पोलीस पाटलांना पाचारण केले, व शोध मोहीम राबवली. त्यावेळी त्यांनी त्यांच्या राहत्या खोल्यांची तपासणी केली असता, त्या ठिकाणी चंचल विष्णु देव उर्फ विश्‍वनाथ रॉय उर्फ पहन वय २९ रा बेनिपुर पोस्ट कटला जिल्हा बिनासपूर बांगलादेश हा आढळून आला. पथकाने त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता, त्याने माझ्याकडे पासपोर्ट नसून सोलापूर येथील एका एजंटाकडून आधार कार्ड बनवून घेतल्याचे सांगितले. त्यांने दिलेल्या माहिती नुसार, रजा हुजूरअल्ली हुसेन वय ३८ रा कटला व त्याचा तिसरा साथीदार मीनल शनीचेरा (वय ३०) रा फुलयोनी हमरस डंगापाडा, तहसील कटला जिल्हा बिनासपूर हे आढळून आले. त्या तिघांकडून पंचा समक्ष साडे आठ हजार रुपये, किमतीचे तीन मोबाईल जप्त करण्यात आले. या घटनेचा पंचनामा इ साक्ष एप्लीकेशन मोबाईल द्वारे करण्यात आला. या तिघाकडे भारतामध्ये येण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे नाहीत, पासपोर्ट नाही, तसेच सीमेवरील मुलकी अधिकाऱ्याची परवानगी ही नाही असे चौकशीत आढळून आले. त्यामुळे या तिघा विरोधात मोहोळ पोलीस ठाण्यातील गोपनीय विभागाचे पोलीस हेडकॉन्स्टेबल गोपाळ बजरंग साखरे यांनी फिर्याद दिली. ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर, पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या घटनेचा तपास मोहोळ पोलीस करीत आहेत.

## पुण्यतिथी साजरी

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर** : समस्त तिलवण तेली समाजाच्यावतीने शनिवार दि.२८ रोजी जगद्‌गुरु संताजी महाराज जगनाडे यांची पुण्यतिथी कार्यक्रम साजरा करण्यात आला. याप्रसंगी ज्ञानेश्वर फलटणकर, अध्यक्ष विशाल नागमल, भारत नागमल, चंद्रकांत क्षीरसागर, रामकृष्ण क्षीरसागर, रामराव पडगळ, सामनाथ राऊत, पांडुरंग पडगळ, दत्ता शेडगे यांच्यासह सर्व समाज बांधव उपस्थित होते.

# आर्थिक स्थिरतेचा वाटाड्या डॉ. मनमोहन सिंगजी !



राजकारणाचं वास्तव हे व्यक्ती केंद्रीत कधी नसते. समाज हिताची वर्धिष्णु वाटचाल ही व्यक्ती केंद्रीत कधी नसते. समाजहित आणि राष्ट्रहित याची एकसंघ शक्ती वास्तविक पाहता राजकारणाची केंद्रबिंदू असतात आणि हीच भूमिका सम्राट अशोकापासून ते पूज्य महात्मा गांधीजीपर्यंत या देशात रुढ होत चाललेली आहे. स्वार्थांध शक्ती आणि विचार राष्ट्राचे मनोबल कधी वाढवू शकत नसतात. समाजहीत डोळ्यापुढे ठेवून राजकारणाची अव्याहत दिशा कार्यरत रहावी हाच भारतीय राजकीय संस्कृतीचा विचार आहे. परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी याच भूमिकेतून संविधानाची दिशा प्रत्यक्षात उतरवली आणि हे राष्ट्र, ही भारतभूमी लोकशाहीच्या सर्वोच्च पदावर पोहोचली आणि नेमका हाच विचार राजकारणाचे गुह्य डोळ्यासमोर ठेवून कै. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी कृतीत उतरवले.

आज दुपारी बाराच्या सुमारास त्यांचा अंत्यविधी पार पडला. त्यावेळी उपस्थित असलेल्या सर्वपक्षीय नेत्यांच्या अंतःचुक्षुत हेच विचार समोर येत होते. विरोध हा तात्विक असावा, विरोध हा सर्वसामान्य माणसाच्या परिभाषेचा अंतःकरणाचा सूर असावा. हाच विचार घेऊन पंतप्रधान मोदी यांनी आपल्या दोन टर्म पूर्ण करत करत या राष्ट्राला आर्थिक स्थैर्याची वाट दाखविली. डॉ. मनमोहन सिंग हे कृतीशील राजकीय व्यक्तीमत्व होतं. या देशातल्या सामान्यातल्या सामान्य माणसाला जगण्याची दिशा दाखवून राष्ट्रीयकरणाची उदारता, अर्थकारणाची नीती यांची सांगड घालून त्यांनी अर्थकारणाचा एक विचार स्थिर केला. तत्कालीन विरोधी पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टी, कम्युनिष्ट पक्ष आणि देवेगौडांची काँग्रेस या तिन्हीही पक्षातील विचार श्रेणींने डॉ. मनमोहन सिंग यांच्या कारकिर्दीत त्यांच्या धोरणात्मक प्रतिमेवर जरुर विरोध केला. पण त्यांच्या स्वच्छ, .निस्पृह कार्यावर कधी उपरोधात्मक बोट दाखविले नाही हे वास्तव नाकारता येणार नाही.

डॉ. मनमोहन सिंग यांच्या कारकिर्दत देशाला आर्थिक मंदीची झळ बसण्याला प्रारंभ झाला होता. पण त्यांनी देशाच्या रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, केंद्र सरकारचे आर्थिक सल्लागार आणि धोरणात्मक समितीच्या कार्यात सहभाग घेतल्यामुळे त्यांना जो अर्थकारणाचा अभ्यास झाला होता. त्या अभ्यासाच्या बळावर त्यांनी १९९१ साली अर्थमंत्री पदाची सूत्रं हातात घेतली. आपल्या बुद्धीत साठवलेला आणि कृतीत उतरवलेला अनुभव त्यांनी सत्कारणी लावला आणि देशाच्या आर्थिक वाटचालीला एक पाऊल वाट निर्माण करुन दिली. त्यामुळे ज्याप्रमाणात मंदीची झळ देशाला बसावी ती बसू शकली नाही. हे वास्तवही मुळीच नाकारता येणार नाही. देशाच्या विकासाचा दर ६ ते ७ टक्के वाढवून त्यांनी एक वेगळे परिमाण सिद्ध करुन दिले.

१९७६ साली ते अर्थखात्याचे सचिव होते तेंव्हा देशाचे अर्थकारण कशा पद्धतीने नेले पाहिजे याची खातर जमा करुन घेतली. आणि तत्कालीन सरकारला त्यावेळी आपल्या अमोघ सल्ल्याची भेट दिली. डॉ.मनमोहन सिंग यांच्या कालखंडात देशातील बँकांचा राष्ट्रीय 'एनपीए ' दर प्रचंड वाढलेला होता. हे नाकारता येणार नाही. त्यावेळी देशातील राष्ट्रीय आणि सहकारी बॅकांच्याकडून अर्थकारण जणूकांही तापलेल्या तव्यावर ठेवल्यासारखे होते. नवनवीन उद्योगपती, आप्त, स्वकीय आणि राजकारणातील बडी देंढ यांना जे कर्जाचे वाटप केले गेले हे अधोरेखित झाल्याने अर्थकारणाला थोडीसी खीळ बसली आणि बँकींग व्यवसाय घसरणीला लागला. याचवेळी 'एलपीजी' ( राष्ट्रीय उत्पन्न क्षमता ) हे धोरण मनमोहन सिंगांनी राबविले. आणि अर्थकारणाला हळूहळू गती येत गेली. भारत संपूर्ण जगात आर्थिकदृष्ट्या उन्नत होत असताना जी पहाट उगवली ती केवळ डॉ. मनमोहन सिंग यांच्या कृतीशील धोरणामुळे. मनरेगा सारखा कायदा करुन त्यांनी आर्थिक क्रांतीचे दुसरे पाऊल टाकले.

डॉ. मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री आणि पंतप्रधान म्हणून झालेली कारकिर्द भारतीय आर्थिक क्रांतीचा शुभारंभ मानावा लागेल. अर्थशास्त्र हे एक असे शास्त्र आहे त्या शास्त्रज्ञने व्यक्ती, कुटुंब, समाज,राज्य आणि राष्ट्र कशा पद्धतीने वैभवावर पोहोचेल या सूत्राचा तो अविष्कार आहे म्हणजेच अर्थशास्त्र. मनमोहन सिंग यांनी डी,फील. ही पदवी संपादन केलेली होती. त्यामुळे जागतिकीकरणावर,सामाजिक कारणावर, आर्थिक सुधारणांचे बळ कसे निर्माण करता येईल याचे बिजारोपण हे डॉ. मनमोहन सिंग यांनी केले. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष ओबामा यांनी सुद्धा त्यांच्या जाहीर समर्थन आणि स्वागत केले होते. आपल्या १० वर्षाच्या कीर्दीत हे बीजारोपण इतकी घट्ट बसले त्यातून भारत हा आर्थिक संपन्नतेचे हत्यार घेऊन जगासमोर उभा राहिला. ३.५० टक्के आर्थिक विकासाचा दर पाठिमागे पडला आणि २००९ साली तो ९.५० टक्क्केवर गेला. माहितीचा अधिकार जनतेला प्राप्त झाला पाहिजे. ही भूमिका घेऊन अंतर्गत पक्षीय विरोध हेतुपुरस्सर बाजूला ठेवून त्यांनी आर्थिक रणनीती अंमलात आणली हे या हिंदुस्थानचे वास्तव कोण नाकारणार ? ९.५० टक्के अर्थव्यवस्थेचा उच्चचांक गेल्यानंतर जागतिक व्यापार क्षेत्राचे स्वाभाविक विस्तारीकरण झाले आणि फ्रान्स, जपान, अमेरिका, इंग्लंड,झोकास्लाहिव्हीया देशांना व्यापाराची संधी मिळाली आणि अर्थव्यवस्थेला बळकटी येत गेली. डॉ मनमोहन सिंग यांच्या कारकिर्दीत सर्वात मोठे परिवर्तन झाले ते भारत-अमेरिका अणुकराराच्या निमित्ताने. आणि मग मात्र संपूर्ण जग वेगळ्या भूमिकेकडून भारताकडे बघू लागले. १५० वर्षाची गुलामगिरी झुगारुन देऊन राष्ट्र आर्थिक संपन्नतेकडे गेले. त्याचा डॉ. मनमोहन सिंग यांनी घातला होता. हे वास्तव मुळीच नाकारता येणार नाही.

कै. इंदिराजींची दृष्टी डॉ.मनमोहन सिंग तशी दृष्टी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांचीही होती. म्हणून त्यांच्या कारकिर्दीत परमसंगणक निर्माण करुन डॉ. विजय भटकर यांच्या माध्यमातून तंत्रज्ञानाची एक पहाट या हिंदुस्थानात उगवली. हीच नीती विद्यमान पंतप्रधान नरेंद्र दामोदरदास मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सितारामन् यांनी अवलंबली आणि तंत्रज्ञानात आमचा देश वेगळया उंचीवर पोहोचविला. तो पाया, तो विचार डॉ. मनमोहन सिंग यांनी घातला.

राजकारणात या स्वभावाचे उदात्तीकरण होणे गरजेचे असते ते पंडित जवाहरलाल नेहरु कै. लालबहाद्दूर शास्त्री यांच्यानंतर जोपासली असेल ती डॉ. मनमोहनसिंग यांनी स्वीकारली असेल. राजकारणातील खुर्चीवर बसून ज्याला राष्ट्र चालवायचे असते त्याने नम्रतेचीसुर्चिभूतता बाळगायला हवी असते. पंतप्रधानाच्या खुर्चीवर बसलेला हा मानव सेवेचा पुजारी होता. नम्रतेच्या स्वभावाचा स्थायी भाव होता आणि माणसातल्या माणुसकीचा झरा होता. विनम्र संवेदना उत्क्रांतीचे बीजारोपण करते आणि सेवाभावीवृती राष्ट्राच्या संपन्नतेचे स्वप्न रंगवते. हीच बाब डॉ. मनमोहन सिंग यांनी तंतोतंत पाळली आणि विश्वात आमचे अर्थकारण सुदृढ कशी होऊ शकते याची नांदी दाखवून दिली. डॉ.मनमोहन सिंग यांना पक्षीय विरोध सुद्धा अंतस्थ कमी झाला नाही. पण माझ्या सत्तास्थानापेक्षा राष्ट्राचे स्थान अधिक उंच आहे हा विचार यांनी रुजविला. अर्थकारणातील राजकारण समन्वयापेक्षा कृतीशील असावे लागते हा सिद्धांत डॉ. मनमोहन सिंग यांनी भारताच्या राजकारणात मांडला आहे. म्हणून डॉ. मनमोहन सिंग भारतीय राजकीय आर्थिक राजकारणाचे वाटाड्या होते हे सकृतदर्शनी सिद्ध झाल्याशिवाय राहात नाही.



प्रासंगिक
बाळासाहेब बडवे
(संपादक)
मो.नं.7028543453

**सोलापूर :** फ्लाय ९१ या कंपनीकडून गोवा ते सोलापूर व सोलापूर ते मुंबई या मार्गावर विमानसेवा सुरू करण्यासाठी २३ डिसेंबरचा मुहूर्त जाहीर करण्यात आला होता. मात्र, इंधनाच्या सुविधेचे निमित्त करत हा मुहूर्त जानेवारीत ढकलला आहे. विमानतळ प्राधिकरणकडून या मागणीची पूर्तता झाल्यानंतरच सेवा सुरू होईल, अशी माहिती विमानतळाच्या सहाय्यक व्यवस्थापक अंजनी शर्मा यांनी दिली. सोलापूर विमानतळावरून विमानसेवा सुरू होण्याचा मुख्य अडथळा असलेली सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याची चिमणी पाडल्यानंतर साखर कारख्यानाचा दुसरा हंगाम सुरू झाला.

## अ.भा.नामदेव क्षत्रिय महासंघाच्या बैठकीत सर्व ठराव एकमुखाने मंजूर

# पंढरीतील संत नामदेव स्मारक व जन्मस्थळ जिर्णोध्दारासाठी पाठपुरावा करणार

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे शासनाने मंजूर केलेल्या 15 कोटींच्या संत शिरोमणी नामदेव महाराज स्मारकांचे काम लवकर सुरु करण्यात यावे. 2025 मध्ये संत नामदेव महाराजांचा 675 वा संजिवन समाधी सोहळा पंढरपूर येथे भव्य-दिव्य स्वरुपात साजरा करणे तसेच श्री केशवराज संस्थेच्या संत नामदेव महाराजांचे जन्मस्थान असलेल्या प्रदक्षिणा रोडवरील संत नामदेव मंदिराचा जिर्णोध्दार करणे यासह अनेक ठराव अ.भा. नामदेव क्षत्रिय महासंघाच्या राज्यस्तरीय बैठकीत एकमुखाने मंजूर करण्यात आले असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष अॅड. महेश ढवळे यांनी दिली.

येथील संत नामदेव मंदिर येथे शुक्रवार दि. 27 रोजी अ.भा. नामदेव क्षत्रिय महासंघाची बैठक प्रदेशाध्यक्ष अॅड. महेश ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. प्रारंभी श्री केशवराज व नामदेव महाराजांचे पूजन करण्यात आले. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, समाजाचे म्हेत्रे अनंता पतंगे यांच्यासह मयत समाज बांधव, मान्यवरांना श्रध्दांजली वाहण्यात आली. बैठकीमध्ये विविध विषयांवर चर्चा करून सर्व ठराव एकमुखाने हात वर करून मंजूर करण्यात आले. शिपी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी राज्य शासनाने संत नामदेव महाराज आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली आहे. यासाठी अॅड. महेश ढवळे यांनी घेतलेल्या प्रयत्नांना यश आल्यामुळे यावेळी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. यावेळी श्री केशवराज संस्था व समस्त शिंपी समाज पंढरपूर यांच्यावतीने उपस्थित पदाधिकार्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष अॅड. महेश ढवळे म्हणाले, संत नामदेव महाराज आर्थिक विकास महामंडळ हे राज्य शासनाने शिंपी समाजाच्या आार्थिक उन्नतीसाठी मंजूर केले आहे. यासाठी काय करावे लागते याबाबत मार्गदर्शन करून सदर योजनेचा शिंपी समाजातील विविध पोटजातीमधील गरजू लोकांनी लाभ घेण्याचे तसेच शिंपी समाजातील सर्व पोटजातीमधील नागरिकांनी समाजाच्या उन्नतीसाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. संत नामदेव महाराज आर्थिक विकास महामंडळ योजना तसेच संत नामदेव महाराज स्मारकाची उभारणी, संत नामदेव मंदिराचा जीर्णोध्दार करण्यासाठी तसेच सर्वांगिण प्रसगतीसाठी आपण शासनस्तरावर पाठपुरावा करण्यासाठी कटीबध्द असल्याचे त्यांनी सांगितले.

सदर बैठकीमध्ये अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या व राज्य शासनाने 15 कोटी रुपये मंजूर केलेल्या संत नामदेव महाराजांचे स्मारक व संत नामदेव महाराजांचे जन्मस्थान असलेल्या मंदिराचा जीर्णोद्धार करणे या विषयावर सविस्तर चर्चा होऊन हा मार्ग मोकळा करण्याचा निर्णय घेतला. लवकरच भारतातील सर्वात मोठे संत नामदेव महाराजांचे स्मारक व संत नामदेव महाराजांचे मंदिर उभारण्याचा संकल्प याप्रसंगी करण्यात आला. प्रदेशाध्यक्ष अॅड. महेश ढवळे, केशवराव संस्थेचे सर्वेसर्वा रूपेश खांडके, नामदेव समाजोन्नती परिषदेचे अध्यक्ष संजय नेवासकर व पंढरपूर शिंपी समाजाच्या पदाधिकार्यांनी खेळीमेळीच्या वातावरणात या महत्त्वपूर्ण विषयाला सर्वानुमते मंजुरी दिली. संत नामदेव महाराज मंदिराच्या जीर्णोध्दारासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी सढळ हाताने देणगी देण्याचे जाहिर केले. पुढील वर्षी जुलै महिन्यात संत नामदेव महाराजांच्या 675 व्या संजीवन समाधी सोहळ्याचे आयोजन भव्यदिव्य प्रमाणात करण्याचे ठरविण्यात आले. अॅड. महेश ढवळे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून महाराष्ट्रात समस्त शिंपी समाज एकत्र करण्याचा निर्णय घेण्यात आला.

यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष नानासाहेब पाथरकर, संत नामदेव महाराजांचे वंशज ह.भ.प. माधव महाराज नामदास, मुकुंद महाराज नामदास, केशवराज संस्थेचे सचिव धनंजय जवंजाळ, नासपचे अध्यक्ष संजय नेवासकर, पंढरपूर शिंपी समाज अध्यक्ष गणेश उंडाळे, जिल्हाध्यक्ष राजेश धोकटे, केशवराज संस्थेचे विश्वस्त औदुंबर निकते, माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर भावलेकर गुरुजी, प्रदेश पदाधिकारी महादेव खटावकर, ड अजय तल्लार प्रज्ञा तल्लार मुंबई प्रदेश अध्यक्ष अशोक खैरनार संतोष मुळे मनोज भांडारकर, नंदकुमार कोसतवार, अनिल गचके, प्रभाकर नानोटे, महेश मुरलीधर रेळेकर, अरुण होमकर, संतोश माणकुसकर, विलास पोरे, महेश गानबोटे, जयवंत कांबळे, संजय चांडोले, दत्तप्रसाद निपाणकर, छायाचित्रकार किशोर काकडे, प्रशांत काकडे, पत्रकार प्रशांत माळवदे, भिकाजीराव गनबावले, प्रदेश महिला अध्यक्षा रेखाताई मुळतकर, युवक अध्यक्ष अँड. सिद्धार्थ भांबुरे, अकलूजचे विजय देवळे, दिनकर चांडोले, युवक संघटनेचे अध्यक्ष शैलेश धट, दत्तात्रय चांडोले, रत्नाकर पिसे यासह महाराष्ट्रातील एकूण 27 जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष व प्रदेश पदाधिकारी, पुरुष, युवक व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## पक्षी पर्यटनातील नवे अग्निपंख



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** माळढोक पक्ष्यांची संख्या चार वर्षांत एकवरून पुढे गेलेली नाही. भविष्यात कृत्रिम प्रजननामुळेच माळढोक पक्ष्याची संख्या वाढू शकते. मात्र, तत्पूर्वी सोलापूर जिल्ह्याच्या वैभवात भर पाडणारी घटना म्हणजे स्थलांतर करून येणारे फ्लेमिंगो तथा रोहित पक्षी हे सोलापूरच्या पक्षी पर्यटनास लाभलेले नवे अग्निपंख आहेत. यांची संख्या आणि सौंदर्य पाहता माळढोक पक्षाची उणीव हे पक्षी भरून काढतील. उजनी धरण क्षेत्रातील पर्यटन प्रकल्पासाठी हे पक्ष्यामुळे नवे पंख लाभू शकतात. आणि या परिसरात पर्यटकांची संख्या वाढू शकते.

» पान १ वरुन

## पंढरपुरात प्लॅस्टिक कॅरीबॅगचा...

काही व्यापारांना दंड आकारला. यामुळे प्लॅस्टिक कॅरीबॅगचा वापर कमी झाला होता. मात्र गेल्या वर्षभरापासून पुन्हा प्लॅस्टिक कॅरीबॅगचा वापर मोठ्या प्रमाणावर झाला आहे. यामुळे पर्यावरण व नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. तरी पंढरपूर नगर परिषदेने प्लॅस्टिक कॅरीबॅग वर करडी नजर ठेवावी अशी मागणी होत आहे. पंढरपुरात विठ्ठलाच्या दर्शनासाठी दररोज 50 हजाराहून अधिक भाविक येतात. येणारे भाविक विविध पदार्थ खरेदी करतात हे पदार्थ देण्यासाठी व्यापारी प्लॅस्टिक कॅरीबॅगचा वापर करत आहेत. यामुळे पंढरपुरात मोठ्या प्रमाणावर प्लॅस्टिक कॅरीबॅगचा वापर होत असल्याचे दिसून येत आहे.

## कलाकार प्राजक्ता माळी हिचा...

एका खोट्या गोष्टीला किती महत्त्व द्यायचे म्हणून मी त्यावर बोलले नाही महिनाभर संयम ठेवला पण आता त्या संयमाचा देखील चुकीचा अर्थ घेतला जाऊ लागला आहे म्हणून मी आज माध्यमांसमोर माझी भूमिका स्पष्ट करते आहे या सर्व वातावरणात माझ्या क्षेत्रातील लोकांनी आणि कुटुंबीयांनी मला साथ दिली त्यामुळे मी हे सगळे सहन करू शकले असही कृतज्ञतेची भावना प्राजक्ता माळी यांनी व्यक्त केली. सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांच्यावर आरोप करत असताना प्राजक्ता माळी यांच्यासह अन्य महिलांची नावे घेतली होती.

» Selected

## शिंदे पिता-पुत्रीने वाहिली श्रद्धांजली



**सोलापूर :-** माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे यांनी भारताचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या पार्थिवाचे दर्शन घेत त्यांना फुले अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. तसेच यावेळी सिंग कुटुंबीयातील सदस्यांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले.

## विमानसेवा सुरू करण्यासाठी सोमवारी लाक्षणिक उपोषण



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूरची विमानसेवा सुरू करण्यासाठी सोलापूर विकास मंचच्यावतीने लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे. हे उपोषण सोमवार 30 डिसेंबर रोजी सकाळी 10 ते दुपारी 2 वाजेपर्यंत पुनम गेट, जिल्हा परिषद, सोलापूर येथे होणार असल्याची माहिती विकास मंचच्यावतीने देण्यात आली. सोलापूरच्या नागरी विमानसेवेसाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करणाऱ्या नागरिकांच्या भावनांचा आदर राखण्यासाठी आणि शासनाचे लक्ष वेधण्यासाठी या उपोषणात सोलापूरकरांनी सहभागी व्हावे असे आवाहनही विकास मंचच्यावतीने करण्यात आले आहे.

## सत्कार...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** युवक नेते प्रणव परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार ऋषिकेश बडवे मित्र मंडळीच्यावतीने करण्यात आला. याप्रसंगी ऋषिकेश बडवे यांच्यासह मित्र परिवार.

नियमित वाचा
पंढरी संचार

## दक्षिणमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवणार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी मतदार संघाचे आमदार सुभाष देशमुख यांनी होटगी येथील एन टी पी सी येथे जाऊन तपन कुमार बंदोपाध्याय यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी आमदार देशमुख यांनी मतदार संघामध्ये सामाजिक उपक्रम राबवण्यासंदर्भात त्यांच्याशी चर्चा केली. तसेच आगामी काळात मतदारसंघातील जनतेसाठी विविध उपक्रम राबवण्यावर माझा भर असणार आहे. या सर्व उपक्रमाचा नक्कीच फायदा नागरिकांना होईल याची मला खात्री आहे, असेही ते यावेळी म्हणाले.






### जाहीर नोटीस

तमाम लोकोना या जाहीर नोटीसीने कळवण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही रंगनाथ भाऊ आटकळे यांची मालकी हक्क वहिवाटीची होती. सदर मिळकत ही विद्यमान मालक मोहन रंगनाथ आटकळे यांचे नावावर ते रंगनाथ भाऊ आटकळे यांचे वारस म्हणून आलेली आहे व त्यांनी सदर मिळकत ही पिरामल कॅपिटल अड हाउसिंग फायनान्स शाखा-पंढरपूर यांचे कडे कर्ज मागणी केलेली आहे आणि त्या करीता सदर मिळकत ही तारण गहाण म्हणून ठेवून घेवून आमचे कंपनीने कर्ज देण्याची तयारी दर्शवली आहे. सदर परिशिष्टात नमूद केली मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निजोखमी असलेचा भरवसा सदरील विद्यमान वहिवाटदार मालक यांनी आमचे अशील कंपनीस दिलेला आहे. तरी सदरील मिळकती मध्ये कोणाचाही, कसलाही प्रकारचा मालकी हक्क, वारस हक्क, हितसंबध, गहाण, दान, लीज, लीन, भाडे पट्टा, मुखत्यार पोटगी, खंड, नोकरनामा, अदला बदल दस्त, करारनामा, बक्षिसपत्र इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क वा अधिकार असल्यास त्यांनी त्या बाचतीत खालील पत्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसाचे आत सर्व संबधित कागदपत्र व पुराव्यासह आमचेकडे लेखी हरकत कळवून पोहोच घ्यावी. सदरील मुदतीत कोणताही हरकत न आलेस सदर मिळकत ही निर्वेध, निजोखामी व बोजाविरहित असल्याचे आणि त्या कोणाचा हक्क हितसंबध असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे. असे गृहीत धरून आमचे अशील कंपनी सदर मिळकत कर्ज प्रकरणाकरीता तारण म्हणून गहाणखताचा दस्त पूर्ण करतील व तद्नंतर आलेली कोणाचीही, कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. मिळकतीचे वर्णनः डी. सोलापूर. सब.डी. व ता. पंढरपूर पैकी मौजे शेगाव दुमाला येथील मिळकत सिटी सव्हें. क्रं. २५७ क्षेत्र ४४.४२ चौ. मी. (ग्रा.पं.मालमत्ता क्र. ५०/३) (खुली व बांधीव)

पूर्व :- रस्ता
दक्षिण :- रस्ता आणि झबू आटकळे यांचे घर
पश्चिम :- अरुण आटकळे यांचे घर आणि ५ फुट सामाईक रस्ता.
उत्तर:- मनोहर भाऊ आटकळे यांचे घर
(येणेप्रमाणे मिळकत आतील दगड, माती, झाड, झुडूप व तदंगभूत वस्तू हक्कासह)

ता.२८/१२/२०२४

सही/-
**अशिलातर्फे अॅड. रणजित एन. शिंदे**
**R.NO.MAH/3995/2012**
**पंढरपूर**

## चित्रपट दिग्दर्शक मकरंद माने व शिवशाही राजेंद्र कांबळे यांना २०२४ चा "अकलूज भूषण" पुरस्कार जाहीर



**माळशिरस :** राष्ट्रीय पुरस्कार विजेते सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक मकरंद माने यांना व राज्य पुरस्कार विजेते शिवशाहीर राजेंद्र कांबळे यांना २०२४ चा अकलूज भुषण पुरस्कार जाहीर झाला आहे. सहकार महर्षी कै. शंकररावजी नारायणरावजी मोहिते-पाटील यांचे विचारांचा वारसा जपणारे,लोकनेते स्व.प्रतापसिंहजी शंकररावजी मोहिते-पाटील (पप्पासाहेब) यांचे प्रेरणेने,महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटना यांचे वतीने दरवर्षी अकलूज फेस्टिवल आयोजन करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेचे वतीने,अकलुज शहरातील कला,क्रिडा, सांस्कृतिक,सहकार,उद्योग, पत्रकारिता,विज्ञान, लोकप्रशासन,समाजसेवा, अध्यात्मीक इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती,संस्था यांना दरवर्षी अकलुज भुषण हा पुरस्कार दिला जातो. सन २०२४ चा अकलूज भुषण पुरस्कार राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार विजेते सुप्रसिद्ध दिग्दर्शक मकरंद माने यांना व राज्य पुरस्कार विजेते शिवशाहीर राजेंद्र कांबळे यांना जाहीर करण्यात आला आहे.याच बरोबर २०२३ मध्ये अकलूजचे सुपुत्र व सध्या लंडन येथे स्थायीक असलेले वैज्ञानिक अमोल मोहन भंडारे यांना जाहीर केलेला अकलूज भूषण पुरस्कार ३१ डिसेंबर २०२४ रोजी मान्यवरांचे शुभहस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.असे अकलूज फेस्टिव्हलचे आयोजक डॉ.धवलसिंह प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितले.

### Public notice

**Notice is** hereby given that one **Mr.Mohan Rangnath Atkale & Mrsindrabai Mohan Atkale** (herein after referred to as the said mortgage) have agreed to create mortgage in respected of the G.P.property more particularly described in the schedule hereunder in favor of my/our clinent s, Piramal capital and housing finance ltd br. Pandharpur, Dist. Solapur in respect of the property described herein. That the said property came in the name of **Mr.Mohan Rangnath Atkale heir of Rangnath Bhau Atkale.** So I have given this notice to all persons having any claim aginst or in respect the said plot property more particularly described in the schedule hereunder or any part there of by way of sale, exchange, mortgage (Equitable or registered or otherwise) Gift, truts, inheritance, family arragement, maintains, bequest partnership, possession, lease sublease tenancy, license, line charge, pledge, easement or otherwise are hereby requested to notify hte same in writing to me/us with supporting documentary evidence at the address mentioned herein below within 14 days from the date hreof, failing whice the claim or claims, if any of such person's or person's will be considered to have been waived and or abandoned and my clinent shall proceed with disbursement of loan and creation of mortgage in respect of thereof.

**DESCRIPTION OF THE PROPERTY**

C.T.S. no.257 area 44.42 sq Mtr. (G.P.Malmatta No. 50/3) Which is situated at village Shegaon Dumala Tal. Pandharpur, Dist.Solapur
East:- Road
South:- Road and House of Zabu Atkale.
West:- House of Arun Atkale and 5 feet common road.
North-House of Manohar Bhau Atkale.
Dt.28/12/2024

Adv. Ranjeet N Shinde
R.NO.MAH/3995/2012
(Panel advocate)
PANDHARPUR






## पांडुरंग परिवाराचे युवक नेते प्रणव परिचारक यांच्या

# वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान महासंकल्प शिबिराचे आयोजन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पांडुरंग परिवाराचे युवक नेते प्रणव परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त आज पंढरपुरात भव्य रक्तदान महासंकल्प शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन सोलापूर जिल्ह्याचे नेते मा.आ.प्रशांत मालक परिचारक यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरामध्ये तब्बल ३४५ इतक्या रक्तदात्यांनी सहभाग घेतला. यानिमित्ताने परिचारक वाड्यावर कार्यकर्त्यांच्या अलोट गर्दीचा जनसागर उसळला. परिचारकांची लोकांप्रती असणारी श्रीमंती प्रणव परिचारक यांच्या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

प्रणव परिचारक यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने पांडुरंग परिवार युवक आघाडी, प्रणव परिचारक युवा मंच आणि परिचारक गटाकडून रक्तदान संकल्प दिवस साजरा केला जातो. गेल्या दहा वर्षापेक्षा अधिक काळ रक्तदानाचा संकल्प प्रणव परिचारक यांच्या वाढदिवसाचे निमित्ताने अनेक युवक करताना दिसतात. यंदाही परिचारक यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने परिचारकांच्या वाड्यासमोरच रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते सकाळी आठ वाजल्यापासूनच रक्तदारासाठी मोठ्या संख्येने तरुण वर्गाने गर्दी केली होती. पंढरपूर शहर तालुक्यासह मंगळवेढा शहर तालुक्यातील तरुण देखील परिचारकांना शुभेच्छा देऊन रक्तदान करण्यासाठी दाखल झाले होते.



प्रणव परिचारक यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने परिचारक वाड्यावर अलोट गर्दी झालेली दिसून आली. मोठ्या संख्येने झालेल्या गर्दीमुळे परिचाराकांकडे असणारी लोकसंग्रहाची श्रीमंती पुन्हा एकदा अधोरेखित झाली. सकाळी आठ वाजले पासून ते रात्री अकरा वाजेपर्यंत कार्यकर्त्यांचा मोठा राबता आणि रक्तदानासाठीची गर्दी परिचारक वाड्यावर होती. प्रणव परिचारक यांची ग्रंथतुला, साखर तुला आणि वस्त्र तुला अशा प्रकारच्या तुला करून सर्वसामान्यांना वाटप करण्याचा अनोखा उपक्रम मित्रमंडळी यांच्या वतीने करण्यात आला. शैक्षणिक साहित्यचे वाटप देखील या निमित्ताने करण्यात आले. विविध सामाजिक उपक्रमातून आज पासून पुढील आठवडाभर परिचारक यांचा वाढदिवस साजरा होणार आहे.प्रणव परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिराच्या उद्घाटनासाठी अर्बन बँकेचे चेअरमन सतीशजी मुळे यांच्या सह तालुक्यातील जेष्ठ नेते, पदाधिकारी, आजी- माजी नगरसेवक यांच्या सह तरुण सहकारी कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

SUNDAY EDGE
पंढरी संचार pandharisanchar.com 29•DEC•2024




# वासना इतकी मोठी कशी झाली?

या महाराष्ट्राला हे कसलं ग्रहण लागलंय? लहान बालकांची निरागसता, त्यांच्या चेहऱ्यावरचे निर्व्याज प्रेम, ते पाहून मनात उमटणारी मातृत्व पितृत्वाची वात्सल्यपूर्ण भावना, आपली सामाजिक प्रतिष्ठा, किमान लोकलज्जा... या सगळ्या भावभावनांना केवळ वासनेच्या विचाराने पराभूत केले? लैंगिक आकर्षण भावना इतकी मोठी झाली की आपल्या संवेदना मेल्या? सेक्स अपील इतके मोठे झाले आहे की माणसाचा माणुसकीवरील विश्वास उडावा आणि संवेदनशील मने पिळवटून जावे ? असे या घटनांमधून वाटते ....



विश्लेषण
अनिरुद्ध बडवे
पंढरी संचार



सर्वाधिक सामाजिक सुरक्षेचा दावा करणाऱ्या महाराष्ट्रात लैंगिक अत्याचार आणि हत्येच्या घडणाऱ्या घटना मन विषण्ण करणाऱ्या आहेत. बदलापूरच्या घटनेने थरकाप उडवला तर त्या पाठोपाठ कल्याणच्या झालेल्या घटनेने महाराष्ट्राचे मन अक्षरशः गोठवून टाकलं. लहान मुलांवर लैंगिक अत्याचार करायचे आणि निर्दयीपणे त्यांची हत्या करण्याची ही विकृती महाराष्ट्रात इतकी कशी रुजली हे लक्षात येईना. यामुळे नामांकित विख्यात प्रख्यात शिक्षण संस्था त्यांचे संचालक आणि त्यांचे राजकीय लागेबांधे हे तर त्यांचे बळ नसेल ना ?

## बदलापूरची सुरुवात

बदलापूरच्या घटनेने वर्षाच्या अखेरीला विकृतीचा हा नवा प्रवास सुरू झाला तो आज राजगुरुनगरपर्यंत सुरूच आहे. सध्या सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या मंडळींच्या संबंधित असलेली बदलापूरची संस्था ही अशा कारणामुळे समोर येईल असे कधीही वाटले नव्हते. अर्थात या शाळेच्या संबंधित असणारे शब्द प्रतिष्ठित मंडळी या प्रकारांना प्रोत्साहन देत नाहीत हे खरे असले तरी अशाप्रकारचे अत्याचार शाळकरी मुलांमध्ये होतात ही नामुष्की आणणारी गोष्ट आहे.

## मिलेनियम स्कूल : मिनी बदलापूर

बदलापूर येथे जी घटना घडली त्याचीच मिनी आवृत्ती प्रतिष्ठित जाणाऱ्या स्कूलमध्ये घडली. दहा आणि अकरा वर्षाच्या बालकांवर पुण्याच्या समजल्या मिलेनियम लैंगिक अत्याचार होत असल्याचे समुपदेशकाकडून समोर आल्यानंतर आरोपी मंगेश.... त्याला अटक झाली परंतु हे प्रकार तब्बल दोन ते तीन वर्षापासून सुरू असल्याचे लक्षात आल्यानंतर संस्थाचालक अन्वित पाठक यांना देखील पोलिसांनी ताब्यात घेतले. तथापि केवळ जनक्षोभ थांबवण्यासाठी संस्थाचालकांची ही अटक असून त्याला अत्यंत किरकोळ कलम लावले आहेत. जेणेकरून त्याला तातडीने जामीन मिळावा असा आरोप आता त्या चिमुरड्यांच्या पालकांचे वकीलपत्र घेणाऱ्या वकिलांचे म्हणणे आहे.

ही शाळा भाजपाच्या एका नेत्याच्या संबंधित असल्याचा आरोप काँग्रेसने केला. पण यावर एकही भाजपाच्या नेत्याने तोंड उघडले नाही. केंद्रीय मंत्री, राज्याचे मंत्री आणि खासदार असलेल्या कोथरूडच्या मतदारसंघात हा प्रकार घडला तरी देखील सर्व नेत्यांचे मौन हे अनाकलनीय आहे.

आरोपीवरील शिक्षा होण्यासाठी समाज पेटून उठावा असे अपेक्षित असताना उलटे शाळेचे बदनामी होऊ नये म्हणून एक मोठा पालक वर्ग आंदोलनाच्या पावित्र्याला माध्यमांसह अनेकांवर त्यांनी अत्यंत घणाघाती आरोप केले. शाळेच्या व्यावसायिकरणार परिणम होऊ नये म्हणून सभ्य - प्रतिष्ठित पालकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या करिअर बद्दलची भीती दाखवत हा सगळा एक प्लॅनड् इव्हेंट होता की खरोखरच त्या शाळेच्या संस्थाचालकाची यात काही चूक नाही आणि त्यांची अकारण बदनामी होत आहे, याबाबत मत मतांतरे आहेत.

परंतु सातत्याने दोन-तीन वर्षापासून घडणारे हे प्रकार पाहता संस्थाचालकांची यात काहीच चूक नाही असे मनाने धाडशीपणाची होईल. शेवटी अंतिम जबाबदारी ही प्रशासनाच्या आणि व्यवस्थापनाची असतेच.

## सामान्य शिक्षकाला महागडा वकील ?

इतके होऊनही आरोपी असलेल्या मंगेश साळवे या एका अत्यंत सामान्य शिक्षकाच्यासाठी सुचित मेहता यासारख्या नामांकित आणि महागडा वकील आणि त्याचे वकीलपत्र घेणे हे कसे ? हा प्रश्न देखील सर्वसामान्य पालकांना आणि विशेषतः शोषणाच्या बळी पडलेल्या पालकांना आणि त्यांच्या समर्थकांना पडला आहे. म्हणजे एवढे होऊनही त्या शिक्षकाला वाचविण्यासाठी संस्थेने आपले बळ उभा केले काय ? याची शंका येते.

दहा दिवसांपूर्वी समोर आलेल्या या प्रकारानंतर मिलेनियम मधीलच पुन्हा आठ आणि नऊ वर्षाच्या दोन मुलांनी देखील अशाच प्रकारे आपल्यावर अत्याचार झाल्याचे म्हणत शोषणाचे आणखी प्रकार पुढे आणले आहेत

## अत्याचारात महिलेची ही साथ

कल्याणमधील घटना तर विवाह संबंध आणि त्याबद्दल असलेली एक प्रकारची सुसंस्कृतिकता यालाच छेद देणारी आहे. त्यातील आरोपीने दोन पत्नींना सोडचिठ्ठी दिल्यानंतर तिसरी पत्नी केली. तरीही बाहेर लहान मुलींवर त्याच्या वासनांध विकृतीने घाला घातला.

या मुलीला संपवून तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी तिसऱ्या पत्नीने त्याला साथसंगत केली. रक्ताचे थारोळे पसरलेले घर पुसून घेतले मृतदेह पोत्यात भरला आणि दोघांनी मिळून तो रिक्षातून बाहेर निघून फेकला. इतकेच नव्हे तर या प्रकारानंतर नवऱ्याला सुरक्षित ठेवण्यासाठी तिने चक्क आपल्या माहेरचा आधार घेतला आणि शेगाव सारख्या ठिकाणी तिचा नवरा सासरवाडीच्या घरात जाऊन लपून बसला. नेमके आपण कुठे चाललो आहोत ? अशा कुठल्या विकृतीने महाराष्ट्राला पछाडले आहे ? सेक्स, लैंगिक आकर्षण या भावना इतक्या मोठ्या झाल्या आहेत की त्याच्यापुढे सामाजिक प्रतिष्ठा संवेदनशील मन लहान चिमूरड्यांबद्दलची सहानुभूती त्यांचे निरागस प्रेम या सगळ्या भावना बोथट झाल्या ?

या सगळ्याचा कळस काल राजगुरुनगरमध्ये पाहायला मिळाला दोन मुलींना चक्क हॉटेलमधल्या एका बॅरलमध्ये बुडवून कोंबून ठेवल्याचे समोर आले. आठ ते नऊ वर्षाच्या मुलींवर अत्याचार झाल्याची दाट शक्यता आहे. मृत अवस्थेत सापडलेल्या दोन मुलींचे मृतदेह अक्षरशा घडी घालून ठेवल्यासारखे बॅरलमध्ये कोंबले होते. ते समोर आल्यानंतर तर अंगाचा थरकाप उडाला.

## गृहमंत्र्यांकडून अपेक्षा

राजकीय नेते किंवा त्या नेत्यांचे आप्तस्वकीय किंवा कार्यकर्ते यांच्या जवळून संबंध आहे हे पाहता सर्वच राजकारणाबद्दल कमालीची चीड व्यक्त होत आहे. विशेषतः ज्या अपेक्षेने या महाराष्ट्राचे लोकनेते म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा पुढे येत आहे त्या प्रतिमेलाही कुठेतरी डाग लागत असल्याचे यातून दिसून येते. महाराष्ट्राला या गुन्हेगारीपासून आणि या विकृतीपासून वाचवण्यासाठी कठोर शिक्षा करत एक प्रकारची कायद्याची दहशत बसावी असा पवित्र आता फडणवीस यांना घ्यावा लागेल भले त्यामध्ये काही स्व पक्षाचे अथवा विचारधारेचे लोक व संस्था सहभागी असतील तरीही.... !

# आर्थिक सुधारणांचा किमयागार


माजी पंतप्रधान आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ. मनमोहन सिंग यांनी अखेरचा निरोप घेतला. गेल्या काही वर्षांपासून ते सक्रिय राजकारणात नव्हते; परंतु लोकसभेच्या निवडणुकीच्या काळात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धार्मिक ध्रुवीकरणावरून उत्तर दिले होते. डॉ. सिंग यांनी प्रथम आर्थिक सल्लागार म्हणून देशाची सेवा केली आणि त्यानंतर देशाचे अर्थमंत्री आणि पंतप्रधानही झाले. त्यांनी १९९१ च्या आर्थिक संकटातून भारताला बाहेर काढले. त्यांचे सुरुवातीचे आयुष्य संघर्षमय होते. त्यांना पैशाच्या कमतरतेचा सामना करावा लागला. संघर्षाच्या दिवसांमध्येही त्यांनी कठोर परिश्रम सोडले नाहीत आणि समर्पणवृत्तीने स्वत:चा ठसा उमटवत राहिले. २००४ च्या लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीपर्यंत अटलबिहारी वाजपेयी सरकार निवडणुकीत पराभूत होऊ शकते, याची कुणालाही कल्पना नव्हती. सर्व निवडणूक विश्लेषक 'एनडीए' सरकारच्या पुनरागमनाचा दावा करत होते. मतमोजणीच्या सुरुवातीच्या ट्रेंडमध्ये भाजप पिछाडीवर पडल्याने हे सुरुवातीचे कल असल्याचे सांगत होते.

भाजप नक्कीच पुनरागमन करेल, असे सांगितले जात होते; पण तसे झाले नाही. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीने निवडणुका जिंकल्या. त्यानंतर सोनिया गांधी आता पंतप्रधान होतील, असे मानले जात होते. तथापि, 1998 मध्ये सोनिया यांनी राजकारणात प्रवेश करताच शरद पवार, तारिक अन्वर आणि पी. ए. संगमा यासारख्या नेत्यांनी सोनिया यांच्या परदेशी मूळाच्या मुद्द्यावरून पक्ष सोडला आणि १० जून १९९९ रोजी नवीन पक्षाची स्थापना केली, तरीही संख्याबळ 'यूपीए' च्या बाजूने असल्याने आणि शरद पवारांपासून लालू प्रसाद यादवांपर्यंत सर्वच जण सोनिया पंतप्रधान झाल्याबद्दल दावे करत असल्याने या विजयानंतर परदेशी मुळाचा मुद्दा संपुष्टात आल्याचे दिसत होते.

या टप्प्यावर भाजपचे बहुतांश नेतेही गप्प बसले होते; परंतु सुषमा स्वराज आणि उमा भारती यांनी सोनिया यांच्या विदेशी मूळचा मुद्दा तापवला. स्वराज यांनी तर सोनिया गांधी यांनी

> **कठीण परिस्थितीतून संघर्ष करून पुढे येणारे कोणत्याही संकटावर मात करू शकतात. डॉ. मनमोहन सिंग यांच्या बाबतीत हा अनुभव येतो. अनेकविध पदे त्यांच्याकडे चालत आली; परंतु १९९१ मध्ये अर्थमंत्रिपद स्वीकारल्यानंतर त्यांनी लागू केलेले आर्थिक धोरण आजतागायत कोणालाही बदलता आले नाही. ते दूरदृष्टीचे नेते, अर्थतज्ज्ञ होते. त्यांच्यामुळे देशाला आर्थिक विकासाचा मार्ग सापडला.**

पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यास मुंडन करण्याचा इशारा दिला होता. हे प्रकरण पुन्हा चांगलेच तापले. नटवर सिंह यांच्या म्हणण्यानुसार, राहुल यांनी सोनिया यांना आपली विनंती मान्य करण्यासाठी २४ तासांचा अवधी दिला होता. पंतप्रधानपद स्वीकारले, तर कोणत्याही थराला जाऊ अशी धमकी दिली. राहुल यांच्या हट्टीपणामुळे सोनिया यांना पंतप्रधानपद नाकारण्यास भाग पाडले होते. नीरजा



व्यक्तिवेध
उल्हासदादा पवार
पंढरी संचार

चौधरी यांनी त्यांच्या 'हाऊ प्राईम मिनिस्टर डिसाईड' या पुस्तकात लिहिले आहे की, या घटनेनंतर काही दिवसांनी नटवर सिंह यांच्याशिवाय विश्वनाथ प्रताप सिंह यांनीही त्यांना सांगितले होते, की सोनिया गांधी यांनी पंतप्रधानपद स्वीकारावे, असे त्यांच्या मुलांना वाटत नव्हते. कारण, पंतप्रधानपद स्वीकारले तर त्यांचे जीवन धोक्यात येण्याची भीती वाटत होती. विश्वनाथ प्रताप सिंह हे सोनिया गांधींच्या सरकार स्थापन करण्याच्या बाजूने होते. नीरजा चौधरी ते सोमनाथ चटर्जी यांनीही विश्वनाथ प्रताप सिंह यांच्या विधानाला दुजोरा दिला. विश्वनाथ प्रताप सिंह यांच्या जवळचे असलेले संतोष भारतीय यांनी त्यांच्या 'विश्वनाथ प्रताप सिंह, चंद्रशेखर, सोनिया गांधी आणि मी' या पुस्तकातही या घटनेचा उल्लेख केला आहे.

या सर्व काळात डॉ. सिंग हे शांत होते. त्यांना आपण पंतप्रधान होऊ, असे स्वप्नातही वाटले नव्हते; परंतु त्यांनी नरसिंह राव यांच्या काळात देशाला दिलेली दिशा, त्यांची निष्ठा पाहून काँग्रेसने त्यांच्या गळ्यात पंतप्रधानपदाची माळ घातली. त्यांच्या कार्यक्षमतेवर विश्वास ठेवूनच सोनिया यांनी हा निर्णय घेतला. एकाच वेळी भाजपच्या 'व्हिसल ब्लोअर' चा आवाज बंद करणे आणि एका नोकरशहाच्या हाती देशाची सूत्रे देऊन त्यांच्या हाताखाली अन्य नेत्यांना काम करायला लावणे हा उद्देश होता. डॉ. सिंग हे देशातील आर्थिक सुधारणांचे जनक आहेत. पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली भारतातील मोठ्या आर्थिक सुधारणांचे जनक मानले जाते. त्यांनी १९९१ मध्ये आर्थिक उदारीकरणाचे युग सुरू केले. या निर्णयामुळे 'लायसन्स राज' चे युग संपुष्टात आले. खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या धोरणाचा पाया त्यांनी घातला. त्यांचा १९९१ चा उदारीकरणाचा अर्थसंकल्प अभूतपूर्व मानला जातो. यामुळे आर्थिक सुधारणांच्या नव्या युगाची सुरुवात झाली. या दूरदर्शी पावलाने देशात क्रांती घडवून आणली आणि लाखो लोकांना गरिबीतून बाहेर काढले आणि १९९१ च्या अर्थसंकल्पाने भारताच्या विकासाला चालना दिली.



नवीन औद्योगिक धोरणाची सुरुवात झाली. मनमोहनजींनी भारताच्या आर्थिक परिवर्तनाला प्रेरणा दिली. या अर्थसंकल्पात सिंग यांनी परदेशी कंपन्यांना देशात व्यवसाय स्थापन करण्यासाठी प्रवेश दिला. अनेक नियमही बदलण्यात आले. १९९१ ला ऐतिहासिक अर्थसंकल्पाचे वर्षदेखील म्हटले जाते. कारण या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढवण्याचे काम करण्यात आले. डॉ. सिंग यांनी या अर्थसंकल्पात परवानाधारक राज संपवून आर्थिक उदारीकरणाचे युग सुरू केले. त्यांनी सुरू केलेल्या आर्थिक सुधारणांनी कंपनी कायदा आणि व्यापार व्यवहार कायदा (एमआरटीपी) यासह अनेक कायद्यांमध्ये सुधारणा करून ते सहज, सोपे केले.

### मनरेगा योजना

१९९१ मध्ये परकीय चलन राखीव संकटाचा सामना करत, नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखालील सरकारने जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरण या तीन परिवर्तनकारी आर्थिक सुधारणा सादर केल्या. महाराष्ट्राची रोजगार हमी योजना देशपातशीवर स्वीकारून मनरेगाच्या माध्यमातून गरिबांना रोजगार दिला. त्यांच्या या योजनेवर अनेकांनी टीका केली; परंतु टिकाकारांना नंतर या योजनेचे महत्त्व पटले. गेल्या दहा वर्षांमध्ये त्यांना ही योजना बंद करता आली नाही. डॉ. सिंग पंतप्रधान झाले, तेव्हा त्यांनी गरीब आणि ग्रामीण भारताच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले. २००५ मध्ये त्यांनी 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा' लागू केला. या योजनेंतर्गत ग्रामीण भागात राहणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला वर्षातून किमान शंभर दिवस मजुरीची हमी देण्यात आली होती. सरकार १०० दिवस काम देऊ शकत नसेल, तर बेरोजगारी भत्ता द्यावा लागला. या योजनेमुळे ग्रामीण भागातील गरिबी कमी झाली आणि लोकांचे शहरांकडे होणारे स्थलांतरही कमी झाले. नंतर या योजनेचे नाव बदलून 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा' (मनरेगा) करण्यात आले. ही योजना आजही ग्रामीण भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे.

डॉ. सिंग यांच्या सरकारने २००५ मध्ये देशात पहिल्यांदा माहिती अधिकार कायदा (आरटीआय) लागू केला. त्यांच्या सरकारने आणलेले हे कायदे सर्वसामान्यांसाठी निर्णायक ठरले. या कायद्याने सामान्य माणसाला अधिकार दिले होते. या कायद्यानुसार भारतातील कोणताही नागरिक कोणत्याही सरकारी विभागाकडून माहिती मागू शकतो. यामुळे सरकारी कामात पारदर्शकता आली आणि भ्रष्टाचार कमी झाला. आता आपल्या कामावर जनता लक्ष ठेवून आहे, असे सरकारी अधिकाऱ्यांना कळल्याने ते पूर्वीपेक्षा अधिक जबाबदारीने काम करू लागले. बराक ओबामा यांच्यासोबत अमेरिकेशी अणुकरार करून डॉ. सिंग यांनी देशाला अधिक शक्तिशाली बनवले. डाव्यांचा विरोध असतानाही २००८ मध्ये अमेरिकेसोबत ऐतिहासिक 'अण्वस्त्र करार' केला. या कराराला '१२३ करार' असेही म्हणतात. या करारांतर्गत भारताला आपल्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आण्विक तंत्रज्ञान आणि इंधन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला होता, तरीही हा करार झाला नाही. डॉ. सिंग यांचे हे राजनैतिक यश होते. या करारामुळे जगात भारताचा लौकिक वाढला आणि देश एक जबाबदार अणुशक्ती म्हणून ओळखला जाऊ लागला. या करारामुळे भारताच्या विकासाला नवी चालना मिळाली.

### 'प्रेरणादायी उदाहरण'

भारताला आर्थिक संकटातून बाहेर काढणारे, गरिबांचे सक्षमीकरण करणारे, प्रशासनात पारदर्शकता आणणारे आणि जगात भारताचा दर्जा वाढवणारे दूरदर्शी नेते म्हणून उणीव नेहमीच जाणवत राहील. भ्रष्टाचार, निर्णयाला अर्धांगवायू झाल्याची टीका करणाऱ्या मोदी यांनी ८ फेब्रुवारी २०२४ राज्यसभेत सिंग यांचे कौतुक केले आणि 'प्रेरणादायी उदाहरण' मानले आणि सांगितले की लोकशाहीवर चर्चा होईल तेव्हा राज्यसभेच्या निवृत्त सदस्यांच्या निरोपाच्या निमित्ताने त्यांचे योगदान लक्षात ठेवले जाईल. त्यामुळे केंद्र सरकारच्या विरोधात काँग्रेसने जारी केलेल्या 'ब्लॅक पेपर' चेही त्यांनी स्वागत केले आणि विरोधी पक्षावर ताशेरे ओढताना देशाच्या समृद्धीला बाधा पोहोचू नये यासाठी 'ब्लॅक पेपर' आवश्यक असल्याचे सांगितले. मोदी म्हणाले की, वैचारिक मतभेदांमुळे कधी कधी वादविवादाच्या वेळी भांडणे होतात; पण ती फारच अल्पकाळ टिकतात. हे उद्गारच डॉ. सिंग यांचे महत्त्व अधोरेखित करतात.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

# फोकस

शेकडो वर्षापूर्वी फ्रान्सचा प्रसिद्ध ज्योतिषशास्त्रज्ञ नास्ट्रोडोम्सने २०२५ या वर्षाबाबत भाकित करताना भारत आणि जगाबाबत अनेक महत्त्वाचे अंदाज बांधले. सोळाव्या शतकातील या भविष्यकाराने केलेल्या काही भाकितांचा अनुभव जगाला आला आहे. यात कोरोनासारख्या महासाथीच्या फैलावापासून ते मनुष्य चंद्रावर उतरण्याची घटनांचा समावेश आहे. पण त्यापलीकडे जाऊन विचार करता येणारे वर्ष हे जगासाठी आणि भारतासाठी अतिशय महत्त्वाचे आणि आशाआकांक्षांनी भरलेले असणार आहे. भारताचा विचार करता प्रयागराजमधील कुंभमेळ्यापासून दिल्ली व बिहारच्या विधानसभा निवडणुकांपर्यंत अनेक विषय महत्त्वाचे असतील. ब्लादीमिर पुतीन यांचा भारतदौरा नववर्षात पार पडणार आहे. आरएसएस आणि भाकपची शताब्दीही २०२५ मध्ये आहे. नव्या वर्षातील या घडामोंडीचा वेध...

टिचकी

## वेलकम ‘बीटा’



अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतके दिवस शिल्लक. नववर्षाचा जल्लोष जगभर होईल आणि त्याबरोबरच ‘अल्फा’ पिढी अस्तंगत होऊन ‘बीटा’ पिढीचा उदय होईल. थोडक्यात, ३१ डिसेंबर २०२४ च्या मध्यरात्रीनंतर जन्माला येणारं प्रत्येक बाळ ‘बीटा’ पिढीचं असेल. खरंतर रातोरात असं अचानक काही बदलत नसतं आणि एकाएकी बदल घडायचाच असेल तर त्यासाठी विशिष्ट दिवसाचीच वाट पाहावी लागते, असं नाही. रूढार्थानं वडील, आजोबा, पणजोबा या क्रमाला आपण ‘पिढी’ म्हणतो. परंतु ती झाली ‘कौटुंबिक पिढी’. द ग्रेटेस्ट, द सायलेन्ट, बेबी बूम, एक्स, वाय, झेड, अल्फा आणि आता बीटा या ‘सामाजिक पिढ्या’ होत. कालानुक्रमे घडणाऱ्या घटना, बदलतं तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक बदल यांचा परिणाम घेऊन जी पिढी वाढते, ती सामाजिक पिढी होय. या बदलांचा अभ्यास करणारे समाजशास्त्रज्ञ पिढीबदलाचं वर्ष निश्चित करतात. त्यानुसार २०१० ते २०२४ या काळात जन्माला आलेली मुलं ‘अल्फा’ पिढीची होती. येत्या एक जानेवारीला ‘बीटा’ पिढीच्या उदयाचा काळ सुरू होईल. त्यामुळं नववर्षाच्या आधी या पिढीचं स्वागत करणं क्रमप्राप्त आहे. वास्तविक, ‘आमच्या वेळी असं नव्हतं,’ हे वाक्य प्रत्येक पिढीला ऐकावं लागतं आणि ‘जनरेशन गॅप’सुद्धा प्रत्येक पिढीला अनुभवायला मिळतो. प्रत्येक पिढी इतिहासाचा अभिमान बाळगते आणि त्याची मोडतोडही करते. पण महत्त्वाचं असतं इतिहासापासून योग्य बोध घेणं.

उदयोन्मुख ‘बीटा’ पिढीचं सहर्ष स्वागत करताना अंतःकरणापासून सांगावंसं वाटतं, की बाळांनो, नवतंत्रज्ञानाचा चमचा तोंडात घेऊन जरी तुम्ही जन्माला येणार असलात, तरी तुमच्याच बरोबर जन्माला येणाऱ्या असंख्य बाळांना तंत्रज्ञानातला ‘त’ ठाऊक नसेल. रोजचं अन्न मिळवणं, स्वच्छ पाण्यासाठी भटकणं त्यांच्या नशिबी असेल. जगभरातली असंख्य मुलं युद्धात उद्ध्वस्त झालेल्या घराची राख चिवडून आईबापाला शोधत असतील. जगणं जमलं तर तीही शिकतील; पण तुमच्यात आणि त्यांच्यात बरंच अंतर असेल. तुमची दृष्टी जर त्यांच्यापर्यंत पोहोचली, तर तुम्ही माणसाच्या पोटी जन्म घेतलाय असं बेलाशक समजा. कारण, आयुष्यात चार-पाच सामाजिक पिढ्या पाहिलेल्यांचा अनुभव असं सांगतो, की अंतरं वाढतच चाललीयेत. जितकं पुढे जावं तितकी मागे पाहण्याची प्रवृत्ती वाढत चाललीये. आपला जन्म कुठल्या पिढीत झालाय, यापेक्षा तो कुठल्या वंशात झालाय याचंच महत्त्व वाढत चाललंय. जितकं शिकावं तितकं अज्ञान आणि जितकं ‘कल्चर्ड’ व्हावं तितका रानटीपणा वाढतोय. मागच्या पिढीच्या संवेदनांविषयी पुढच्या पिढीला देणंघेणं नसेल, असं प्रत्येक वेळी जोरजोरात सांगितलं जात असलं तरी तसं दिसत मात्र नाहीये.

भोवताल बदलेल तशी मानसिकता बदलते असं समाजशास्त्रज्ञ सांगतात. पण जनरेशन एक्स, वाय, झेड आणि आताची अल्फा या क्रमानं आत्मकेंद्रीपणाच वाढत जाताना दिसला. मानसिकता अशीच बदलणार असेल, तर अधिकाधिक खडतर आव्हानांसाठी तयार राहा, लेकरांनो! एका नितांतसुंदर जगात तुमचं स्वागत करताना त्यातल्या विद्रूप गोष्टींवर बोट ठेवणं हे खरंतर पाप आहे; पण जगात पहिलं पाऊल ठेवताना बाळं अजूनही रडतात, हेच वास्तव आहे. तुम्हीही रडतच येणार आहात बीटाबाळांनो; पण हसणं चिरंतन करण्याची माणसाने गमावलेली शक्ती घेऊन या.

◆◆◆

## वेध नूतन वर्षाचा

**कल्याणी शंकर**
ज्येष्ठ पत्रकार-विश्लेषक, नवी दिल्ली



सध्या बहुतांश मंडळी नवे २०२५ वर्ष कसे असेल? याचा विचार करत असतील. अर्थात सर्वत्र संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. कोणाला पश्चिम आशियातील युद्धाचे स्वरुप काय असेल? यावरून चिंता आहे, रशिया-युक्रेन युद्ध कधी थांबणार यावरून तर्कवितर्क लावत आहेत तर काहींना सोन्या चांदीचे भाव काय असतील, याचे आकडेमोड करत असतील. एकुणातच प्रत्येक जण आपापल्या पद्धतीने नव्या वर्षाचा ताळेबंद मांडत आहेत. पण शेकडो वर्षापूर्वी फ्रान्सचे प्रसिद्ध ज्योतिषाचार्य नॅस्ट्रोडॅमने २०२५ या वर्षाबाबत भाकित करताना भारत आणि जगाबाबत अनेक महत्त्वाचे अंदाज बांधले. सोळाव्या शतकातील या भविष्यकाराने अशा काही घटनांचा तर्क मांडलेला असून यापूर्वी त्याचा अनुभव जगाला आला आहे. यात कोरोनासारख्या महासाथीचा फैलावापासून ते मनुष्य चंद्रावर उतरण्याची घटना याचा यात समावेश आहे. दरवर्षी नॅस्ट्रोडॅमच्या अंदाजाबाबत आश्चर्य व्यक्त केले जाते. अजूनही अनेक मंडळी सोळाव्या शतकातील या भविष्यकाराचे विश्लेषण करत आहेत आणि त्यांच्या अचूक भाकितावरूनही प्रभावित होताना दिसतात. नॅस्ट्रोडॅमच्या अंदाजानुसार रशिया युक्रेन युद्ध २०२५ मध्ये थांबू शकते. त्यांच्या इशाऱ्यानुसार दोन्ही देश हवामान बदल आणि महापुराचा सामना करू शकतात. ‘द न्युयॉर्क पोस्ट’ च्या अंदाजानुसार तुर्किए आणि फ्रान्स हे युक्रेन आणि रशियातील संघर्ष थांबविण्यासाठी प्रयत्न करतील आणि शांतता प्रक्रियेत सहभागी होतील. नॅस्ट्रोडॅमने आगामी वर्षात ब्रिटनमध्ये जुना प्लेगसारखा आजार पुन्हा उद्भवण्याची शक्यता वर्तविली. तसेच रशिया-युक्रेन युद्धात ब्राझीलचा सहभाग तसेच अनेक नैसर्गिक घटनांचा अंदाज बांधला आहे. शिवाय नॅस्ट्रेडॅमच्या एका अंदाजानुसार पृथ्वीवर एक लहान ग्रह किंवा एस्टिरायडशी धडक होऊ शकते. पण हे खरे की खोटे हे आगामी काळच सांगेल. त्यांनी म्हटल्यानुसार ब्रह्मांडात एक आगीचा लोळ उठेल आणि तो भविष्य बदलून टाकेल. नॅस्ट्रोडॅमची भविष्यवाणी ही आपल्याला संभाव्य घटना अणि त्याच्या परिणामाबाबत सजगता निर्माण करते.

भारताच्या भविष्याचा विचार केला २०२५ ची सुरुवात प्रजासत्ताक दिनाच्या संचलनाने होईल. यंदाची संचालनाची संकल्पना ‘स्वर्णिम भारत, विकसित भारत’ अशी आहे. अर्थात अजून मुख्य संचालनाच्या प्रमुख पाहुण्याचे नाव निश्चित झालेले नाही. धार्मिक दृष्टीकोनातून पाहिल्यास प्रयागराज येथे महाकुंभमेळा १३ जानेवारी ते २६ फेब्रवारीपर्यंत चालणार आहे. अर्थात कुंभमेळा हा दर बारा वर्षांच्या कालखंडानंतर वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित केला जातो. या निमित्ताने लाखो भाविक आणि जनता गंगा, यमुना आणि सरस्वतीच्या पवित्र संगमावर स्नानासाठी गर्दी करतात. केंद्र आणि राज्य सरकारने महाकुंभमेळ्याच्या आयोजनाची जोरात तयारी केली आहे. २०२५ मध्ये भारताचा वेगवान आर्थिक विकास, सामाजिक बदल तसेच नवनवीन तंत्रज्ञान पाहवयास मिळू शकतात. सरकारकडून तंत्रज्ञान शिक्षण आणि शाश्वत ऊर्जेच्या क्षेत्रात वेगाने विकास केला जात आहे. या आधारावर आर्थिक विकास वेगाने होण्याची अपेक्षा असून तो भारताच्या समृद्धीच्या दृष्टीने चांगले संकेत आहेत.

जागतिक पातळीवर भारताचे महत्त्व या वर्षात आणखी वाढण्याची शक्यता आहे. जगातील वाढते स्थान पाहता भारत अन्य मोठ्या अर्थव्यवस्थांच्या देशांसमवेत व्यापार, संरक्षण आणि हवामान बदल क्षेत्रात सहकार्य वाढवेल. यानुसार भारत स्वतःचे जगात वाढत्या राजकीय शक्तीचे महत्त्व अधोरेखित करू शकतो. देशपातळीवर विरोधी पक्षाची ‘इंडिया’ आघाडी सध्या आव्हानांचा सामना करत आहे आणि त्यांच्या ऐक्यावर प्रश्न उपस्थित होत आहेत. आघाडीत ताणतणाव सुरू आहे. तृणमूल काँग्रेस,आम आदमी पक्ष यांनी आघाडीपासून दूर राहण्याचे ठरविले आहे. ‘आप’ पक्षाने दिल्ली विधानसभेत स्वबळाचा नारा बुलंद केला आहे.



कव्हर

‘इंडिया’ आघाडीमध्ये हरियाना, महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभेच्या निवडणुकीच्या काळात मतभेदाच्या ठिणग्या उडत होत्या.एकीकडे काँग्रेसने हरियाना, महाराष्ट्रात खराब कामगिरी केलेली असताना झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चासह आघाडीने विजय मिळवला. ‘इंडिया’ आघाडीचे सदस्य काँग्रेसच्या निराशाजनक कामगिरीने हताश दिसत आहेत. त्यांची नजर आता २०२५ मधील दिल्ली आणि बिहार विधानसभेच्या निवडणुकीवर आहे. या निवडणुकीत काँग्रेस कशी कामगिरी करतो, यावर सर्वांच्या नजरा आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीतून भावी राजकीय ध्रुवीकरण पाहवयास मिळू शकते. दिल्लीत विधानसभा निवडणुका फेब्रुवारीत होत असून तेथे भाजपने आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांना सत्तेतून हटविण्यासाठी कंबर कसली आहे. ‘आप’ पक्षाने गेल्या काही काळात अनेक आव्हानांचा मुकाबला केला आहे. त्याचे अनेक नेते भ्रष्टाचाराच्या आरोपावरून तुरुंगात जावून आले आहेत. एका रणनितीनुसार ‘आप’ पक्षाने आतिशी मार्लेना यांना दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी बसविले. अर्थात ‘आप’ पक्ष आणि काँग्रेसने दिल्लीत लोकसभा निवडणुक एकत्र लढविली. यात ‘आप’ची कामगिरी बरी राहिली, परंतु काँग्रेसला एकही जागा मिळाली नाही. पुढील वर्षी बिहार विधानसभा निवडणूक असून ती राजकीय रुपातून अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या ठिकाणी सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे नेतृत्व मुख्यमंत्री नितीशकुमार करत आहेत. त्यांना राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील ‘महागठबंधन’कडून आव्हान मिळत आहे. एकुणातच भाजप आणि जेडीयूकडून बिहार पुन्हा काबीज करण्याचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. २०२५ मध्ये देशातील दोन महत्त्वाच्या संघटना भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचे शताब्दी वर्ष आहे. संघ आपले शंभर वर्ष सप्टेंबर महिन्यात पूर्ण करेल तर ‘सीपीआय’कडून डिसेंबरमध्ये शताब्दी महोत्सवाची सुरूवात केली जाईल. गेल्या काही काळापासून अनेक चढउतारांचा अनुभव घेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने भारतीय राजकारण आणि समाजावर सखोल परिणाम केला आहे. संघाची पाळेमुळे खोलवर रुजल्याने आता आगामी काळात एखाद्या सरकारला ही संघटना कमकुवत करण्याचे काम कठीण राहू शकते. त्याचबरोबर कट्टरपंथीय पक्षाची लोकप्रियता वाढल्याने कम्युनिस्ट पक्षांचा प्रभाव कमी झाला आहे.

आंतरराष्ट्रीय आघाडीचा विचार केला तर भारत २०२५ मध्ये क्वाड संमेलनाचे यजमानपद भूषवेल. अर्थात ही परिषद सप्टेंबरमध्येच नवी दिल्लीत होणार होती. परंतु यात सहभागी होणाऱ्या नेत्यांच्या व्यग्रतेमुळे ही परिषद न्यूयॉर्कमध्ये पार पडली. आता २०२५ मध्ये क्वाड शिखर संमेलनाचे आयोजन केले जाईल. यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प दिल्लीत येण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय घडामोडीत भारताचे स्थान आणखी बळकट होऊ शकते. पुढील वर्षाच्या प्रारंभी रशियाचे अध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांचा भारत दौरा प्रस्तावित असून ती एक मोठी संधी असणार आहे. क्रेमलिनने पुढील वर्षाच्या प्रारंभी त्याची तारीख जाहीर करणार असल्याचे म्हटले आहे. युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर पुतीन यांचा पहिलाच भारत दौरा असेल. एकुणातच २०२५ हे भारतासाठी आशा आकांक्षांनी व्याप्त असे वर्ष आहे. अर्थव्यवस्थेची चांगली प्रगती होत आहे आणि परकी संबंध देखील स्थिर आहेत. अर्थात त्याची राजनैतिक स्थिती अस्पष्ट आहे. आगामी वर्षात काँग्रेसच्या स्थितीत काही सुधारणा होईल का? किंवा भाजप आणि अन्य प्रादेशिक पक्ष मतदारांवरचा पगडा आणखी मजबूत करण्यात यशस्वी होईल का? हे पाहणे महत्त्वाचे आहे. ◆◆◆

## बनावट औषधांचा विळखा

**सूर्यकांत पाठक,**
राष्ट्रीय ग्राहक ग्राहक पंचायत

गेल्या पंधरा महिन्यांपासून राज्यातील विविध भागात बनावट औषधांचा साठा सापडत असताना आणि तोही सरकारी रुग्णालयात आढळून येत असताना या प्रकरणात आतापर्यंत पोलिस आणि अन्न व औषधी प्रशासनाच्या हाती कोणतेच धागेदोरे लागलेले नाहीयेत. बनावट औषधे उपचारात काम करत नाहीत आणि लोकांना बराच काळ आजारी ठेवण्याचे काम करतात. कधी कधी ही औषधे जीवघेणे ठरू शकतात. प्रसंगी उपचारांचा खर्च वाढू शकतो आणि मनुष्यक्षमतेवर परिणाम होतो.



सेंट्रल ड्रग्ज स्टँडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशनने (सीडीएससीओ) घेतलेल्या चाचण्यांमध्ये ५३ औषधांचे नमुने अयशस्वी झाल्याचे उघडकीस आल्यानंतर आपण घेत असलेली औषधे बनावट आहेत की काय, अशी भीती सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. त्यांची भीती रास्त आहे. कारण एका अभ्यासानुसार देशात विकल्या जाणाऱ्या २५ टक्के औषधे बनावट असतात. बनावट असणे म्हणजे ही औषधे नामांकित कंपन्यांच्या लेबलची नक्कल करून बनावट कंपन्यांकडून बाजारात पुरवली जात आहेत. गुणवत्तेच्या चाचणीत अयशस्वी झालेल्या औषधांमध्ये पेनकिलर डायक्लोफेनाक, अँटीफंगल औषध फ्लुकोनाझोल, व्हिटॅमिन डी सप्लिमेंट, बीपी आणि मधुमेहासाठी औषध, अॅसिड रिफ्लक्स इत्यादींचा समावेश आहे. सीडीएससीओच्या अहवालामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की औषधांच्या नावाखाली दर्जेदार क्षारांची विक्री केली जात होती.

गेल्या काही दिवसांत महाराष्ट्रातूनही बनावट औषधांच्या बातम्या सातत्याने येत आहेत. ठाणे जिल्ह्यात टाकण्यात आलेल्या छाप्यात १.८५ कोटी रुपये किंमतीचा बनावट औषधांचा साठा पकडण्यात आला. गेल्या काही महिन्यांत भिवंडीतील एक गोदाम आणि मीरा रोड भागातील एका संस्थेवर घातलेल्या छाप्यात बनावट औषधांचा साठा पकडण्यात आला. चौकशीच्या वेळी बनावट औषधांची निर्मिती आणि विक्री करणाऱ्यांकडून खोटे दावे केले जात होते. आम्हीच औषध तयार करत असल्याचे त्यांचे म्हणणे होते. प्रत्यक्षात त्यांचे सूत्रधार वेगळेच होते. ही औषधे अनेक राज्यांत पाठविण्याची तयारी केली जात होती. हा केवळ एक छापा होता. याशिवाय नागपूर, वर्धा, भिवंडी, अंबाजोगाईसह राज्यातील अनेक सरकारी रुग्णालयांत बनावट औषधांचा पुरवठा केल्याचे समोर आले आहे. शिवाय औषधांच्या पुरवठ्यातील बनवाबनवी देखील उघडकीस येत आहे. यामागे आंतरराज्यीय टोळीचा हात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे गेल्या पंधरा महिन्यात कोणत्या ना कोणत्या सरकारी दवाखान्यात बनावट औषधांचा साठा सापडत आहे आणि त्या प्रकरणांचा तपास केला जात आहे. तरीही प्रशासनाच्या हाती ठोस काहीच लागलेले नाही.

नागपूर, वर्धा, भिवंडीसह आता आंबेजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा झाल्याचे प्रकरण उघड झाले. या रुग्णालयात उपचार घेणाऱ्या एका रुग्णास बनावट औषधांमुळे रिॲक्शन आली. यामुळे रुग्णालय प्रशासन खडबडून जागे झाले आणि त्यांनी अन्न आणि औषध प्रशासनाकडे तक्रार नोंदविली. पोलिसांच्या तपासात नागपूरमध्ये देखील असाच प्रकार झाल्याचे उघड झाले. तेथे ॲजिथ्रोमायसिनच्या बनावट गोळ्यांचा पुरवठा झाल्याचे निष्पन्न झाले. अशावेळी अन्न आणि औषधी प्रशासनाने या औषधांचा वापर थांबवण्याचा निर्णय घेतला आणि या साठ्याची तपासणी केली. यात अंबोजोगाईच्या रुग्णालयात बनावट २५ हजार गोळ्यांचा साठा आढळून आला. ॲजिथ्रोमायसिन गोळ्यांचा पुरवठा करण्याचे कंत्राट दिलेल्या कंपनीने अंबाजोगाईच्या एसआरटी रुग्णालयालाही औषधाचा पुरवठा केल्याचे उघड झाले. शिवाय या कंपनीने नागपूरच्या सरकारी रुग्णालयाला देखील औषधांचा पुरवठा केला. या कंपनीविरुद्ध नागपूरच्या अजनी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेल्या पंधरा महिन्यांपासून राज्यातील विविध भागात बनावट औषधांचा साठा सापडत असताना आणि तोही सरकारी रुग्णालयात आढळून येत असताना या प्रकरणात आतापर्यंत पोलिस आणि अन्न व औषधी प्रशासनाच्या हाती कोणतेच धागेदोरे लागलेले नाहीत, हे विशेष. काही दिवसांपूर्वी दिल्ली पोलिसांनी बनावट औषधांची एक टोळीच पकडली होती. पोलिसांनी या आरोपींकडे कर्करोगावरील वेगवेगळ्या ब्रँडची बनावट औषधी हस्तगत केली. यात सात औषधे परदेशातील आणि दोन भारतीय बनावटीचे होते. आरोपीने केमोथेरेपीच्या इंजेक्शनमध्ये ५० ते शंभर रुपयांची अँटी फंगल औषध भरले आणि तेच गरजुंना सव्वा लाखांत विकण्याचा गोरखधंदा केला. काही दिवसांपूर्वी तेलंगणात औषध नियंत्रक प्रशासकाने खडूच्या पावडरपासून तयार केलेल्या गोळ्या पकडल्या गेल्या. त्याचप्रमाणे गाझियाबादमध्ये बनावट औषध तयार करणारा कारखान्याचा भांडाफोड करण्यात आला. देशातील विविध भागांत अशा प्रकारे पकडला जाणारा भेसळयुक्त औषधांचा साठा पाहता त्याची व्याप्ती लक्षात येते.

उद्योग संघटना असोचेमने २०२२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या अहवालात असे म्हटले आहे की देशांतर्गत बाजारात उपलब्ध औषधांपैकी एक चतुर्थांश औषधे बनावट आहेत. ‘फेक अँड काउंटरफेट ड्रग्ज इन इंडिया - बूमिंग बिझ’ शीर्षकाच्या या अहवालानुसार, देशातील फार्मास्युटिकल मार्केटचा आकार १४-१७ अब्ज आहे, त्यापैकी सुमारे ४.२५ अब्ज किमतीची औषधे बनावट आहेत. एवढेच नाही तर देशात बनावट औषधांचा व्यापार दरवर्षी सरासरी ३३ टक्के दराने वाढत असल्याचेही या अहवालात म्हटले आहे. सरकारी रुग्णालयांमध्ये सर्वाधिक ३८ टक्के औषधे बनावट असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. बारकाईने पाहिल्यानंतरही, ही बनावट औषधे अगदी खऱ्या औषधांसारखीच दिसतात, परंतु बहुतेक प्रकरणांमध्ये, लेबलिंगमधील बदलांमुळे ती ओळखता येऊ शकतता.

एका आजारावरील उपचारपोटी देण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या ब्रँडच्या गोळ्यातील गुणवत्तेत फरक असणे चिंताजनक आहे. बनावट आणि भेसळ औषध आजाराचा सामना करू शकत नाही. त्याचवेळी नवीन आजार बळावण्याची शक्यता बळावते. त्याचे सेवन यकृत, हृदय, तंत्रिका तंत्र यावर परिणाम करते. गुणवत्ता नसलेल्या औषधांची निर्यात झाल्यास देशाच्या प्रतिमेला धक्का पोचतो.

देशाच्या अर्थव्यवस्थेवर बनावट औषधांचा कशा रितीने विपरित परिणाम होत आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. ते आरशाप्रमाणे स्वच्छ आहे. बनावट औषधे उपचारात काम करत नाहीत आणि लोकांना बराच काळ आजारी ठेवण्याचे काम करतात. कधी कधी ही औषधे जीवघेणे ठरू शकतात. प्रसंगी उपचारांचा खर्च वाढू शकतो आणि मनुष्यक्षमतेवर परिणाम होतो. काहीवेळा संबंधितावर नोकरी गमावण्याची वेळ येऊ शकते आणि उपचारासाठी कर्ज देखील घ्यावे लागते. ज्या देशात उपचारासाठी एकदा रुग्णालयात दाखल झाल्यानंतर अनेकांची आर्थिक स्थिती गंभीर होते, तेथे अशा बनावट औषधामुळे तर कंगाल होण्याची वेळ येऊ शकते. बनावट आणि दर्जाहिन औषधांमुळे प्रत्येक वयोगटातील व्यक्तीचा जीव धोक्यात येऊ शकतो. प्रामुख्याने नवजात शिशू आणि ज्येष्ठांसाठी ही भेसळयुक्त औषधी अधिक धोकादायक राहू शकतात. आजाराचा मुकाबला करण्याची शक्ती कमी होणे, औषधांचा जंतूवर परिणाम न होणे यांसारखे परिणामही जाणवतात.

लोकांच्या आरोग्यांशी खेळणाऱ्या या विघातक घडामोडी आता संघटित गुन्हेगारीचे रुप धारण करत आहेत. देशात बनावट आणि भेसळयुक्त औषधांवर प्रतिबंध घालण्यासाठी औषधी आणि प्रसाधन सामग्री अधिनियम-१९४० नुसार दंड आणि शिक्षेची तरतूद आहे. याप्रमाणे बनावट औषधामुळे रुग्णाचा मृत्यू झाल्यास किंवा गंभीर आजारी पडल्यास जन्मठेपेची शिक्षा आहे. भेसळयुक्त किंवा परवाना नसताना औषध तयार केल्यास पाच वर्षाच्या शिक्षेची तरतूद आहे . देशातील विविध भागात २९ औषध प्रयोगशाळा आहेत. याशिवाय आठ केंद्रीय प्रयोगशाळा आहेत. भेसळयुक्त औषधांना चाप बसविण्यासाठी आपल्याकडे स्रोतांचा अभाव नाही. अशा प्रकरणात राजकीय दबावापासून दूर राहत नियामक संस्थांनी कारवाई करण्याची गरज आहे. एक सामान्य व्यक्तीसाठी औषधात कोणकोणते रासायनिक तत्व असतात, हे समजत नाही. रुग्णांना औषधांची पुरेशी माहिती देणे गरजेचे असताना त्यांना स्पष्टपणे माहिती दिली जात नाही.


गेल्या काही वर्षांपासून औषधांवर क्यूआर कोड लावण्यास सुरुवात करण्यात आली. आता ते सर्व औषधांना बंधनकारक करणे गरजेचे आहे. यामुळे औषधांचा काळाबाजार थांबण्यास हातभार लागेल. औषधांची गुणवत्ता निश्चित करण्यासाठी फार्माकोविलिजन्स कार्यक्रम उपयुक्त ठरू शकतो. यात औषधांच्या प्रतिकुल परिणामाचे आकलन करून त्याची गुणवत्ता ठरविली जाते. ग्राहक, रुग्णांचे नातेवाईक यांनी कमी दर्जा असलेल्या औषधांबाबत तक्रार करण्यास पुढाकार घेतला तर कायद्याचा विळखा आणखी आवळला जाईल. औषधी उद्योगांत संशयास्पद कृती रोखण्यासाठी केंद्र सरकारकडून तक्रार निवारण प्रणाली सक्षम केली जात आहे. काही दिवसांपूर्वीच औषध कंपन्यांसाठी युनिफॉर्म कोड फॉर फार्मास्यूटिकल्स मार्केटिंग प्रॅक्टीस (युसीएमपी)-२०२४ लागू करण्यात आला. यानुसार औषध कंपन्यांना आता संकेतस्थळावर हेल्पलाइन किंवा तक्रार निवारण सुविधा उपलब्ध करून द्यावी लागेल. कंपन्यांना आता डॉक्टरांना प्रचाराच्या नावावर गिफ्ट देता येणार नाही. एखाद्या औषध कंपनीने कार्यक्रम आयोजित केला असेल तर त्यात तज्ज्ञ म्हणून बोलावलेल्या डॉक्टरांना प्रवास आणि राहण्याचा भत्ता देता येईल. पण या आयोजनाचा खर्च ‘युसीएमपी’च्या पोर्टलवर जारी करावा लागणार आहे.

◆◆◆

# सिनेमॅटिक

*चित्रपटाच्या माध्यमाचा वापर समाजाला आरसा दाखविण्यासाठी करणाऱ्या मोजक्या दिग्दर्शकांमध्ये श्याम बेनेगल यांचा समावेश होतो. बॉलिवूडच्या मुख्य प्रवाहातील चित्रपटांमधून समाजातील कल्पनाशक्ती निश्चित दिसली. मात्र, कलात्मक चित्रपट प्रेक्षकांना अशा दुनियेत घेऊन गेले, जिथे कॅमेरा फारसा पोहोचला नव्हता, ज्या जीवनाकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात होते. या समांतर चित्रपटांचा प्रारंभ सत्यजित राय यांच्यामुळे झाला, परंतु दीर्घकाळ ही पालखी बेनेगल यांच्याच खांद्यावर राहिली. समाजाला त्यांनी केवळ वास्तव दाखविले असे नव्हे, तर ते उत्कटपणे दाखविणारे कलावंतही त्यांनी घडविले. समाजातील प्रवाहाबाहेरच्या माणसांना पडद्यावर आणण्याबरोबरच या चित्रपटांनी समाजातील कुप्रथाही चव्हाट्यावर आणल्या.*

## तत्त्वनिष्ठ आणि चिंतनशील दिग्दर्शक






सिनेविशेष


■ मानवेंद्र उपाध्याय
चित्रपट समीक्षक

अंकुर, निशांत, मंडी, भूमिका, मंथन, जुनून या चित्रपटांची नावे घेताच कलात्मक चित्रपटांच्या दुनियातील श्याम बेनेगल या चिंतनशील दिग्दर्शकाची आठवण होते. 'आरोहण' या चित्रपटासाठी १९८२ चा राष्ट्रीय पुरस्कार मिळविणाऱ्या श्याम बेनेगल यांनी त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत मोजके २५ हून अधिक चित्रपट केले. त्याचबरोबर सुमारे चाळीस माहितीपटांची निर्मितीही त्यांनी केली.
चित्रपटसृष्टीतील त्यांच्या योगदानासाठी त्यांना १९७६ मध्ये पद्मश्री आणि १९९१ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार बेनेगल यांना २००५ मध्ये प्रदान करण्यात आला होता. याशिवाय त्यांच्या खात्यात ८ राष्ट्रीय पुरस्कार आहेत. सर्वाधिक राष्ट्रीय पुरस्कार जिंकण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. श्याम बेनेगल हे केवळ त्यांच्या प्रतिभेसाठीच नव्हे तर ठाम सामाजिक आणि राजकीय भूमिकेसाठी ओळखले जात. या ठोस भूमिका त्यांच्या चित्रपटांमधूनही प्रकर्षाने आणि उत्कटतेने जाणवल्या.
श्याम बेनेगल यांच्या चित्रपटाची रचनाशैली अद्वितीय होती. टीकाकारही त्यांच्या प्रतिभेमुळे स्तिमित होत असत. राजकीय चित्रपटांची मागणी जर समाजाकडून होत असेल, तरच असे चित्रपट बनविले जाऊ शकतात, असे बेनेगल यांचे मत होते. त्याचप्रमाणे सामाजिक चित्रपटांबद्दलही त्यांची ठाम भूमिका होती. चित्रपट समाजात फार मोठे बदल घडवून आणू शकत नाहीत. परंतु सामाजिक चेतना आणि गांभीर्य निर्माण करण्याची अफाट ताकद चित्रपट माध्यमात आहे, असे ते म्हणत. हे केवळ बोलून ते थांबले नाहीत, तर आपल्या चित्रपटांमधून तसा जाणीवपूर्वक प्रयत्न त्यांनी केला. समाजाच्या निद्रिस्त चेतना जागृत करण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. चित्रपटाचे माध्यम त्यांनी त्या दृष्टीने जबाबदारीने हाताळले. भारतातील समांतर चित्रपटांच्या प्रवर्तकांपैकी ते एक मानले जातात. अगदी आंतरराष्ट्रीय स्तरावरही त्यांना नवविचार देणाऱ्या चित्रपटांच्या परंपरेचे पाईक मानले जाते. सत्यजित राय यांच्यानंतर त्यांचा वारसा बेनेगल यांनी पुढे चालविला आणि त्याला समकालीन संदर्भ प्रदान केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, भारतीय चित्रपटांची विभागणी दोन विभागांत होऊ शकते. सत्यजित राय यांच्या उदयापूर्वीचे आणि त्यानंतरचे चित्रपट अशी ही विभागणी आहे, असे ते मानत. असे असल्यास भारतातील अर्थवाही चित्रपटांची मालिकाही बेनेगल यांच्याच आसपास फिरताना दिसते.
स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय चित्रपटांची वाटचाल एकात्म स्वरूपात झाल्याचे दिसते. मात्र, सत्तर आणि ऐंशीच्या दशकांत चित्रपटांचे दोन प्रवाह प्रामुख्याने दिसतात. व्यावसायिक चित्रपटांच्या जोडीला एक समांतर चित्रपट परंपरा या काळात निर्माण झाली. याला चित्रपटांमधील आंदोलनाचा काळ मानता येईल. मनोरंजनाचे सर्व सरधोपट फॉर्म्युले या समांतर चित्रपटांनी नाकारले. लोकांमध्ये चेतना निर्माण करण्याचे माध्यम म्हणून या काळात काही दिग्दर्शकांनी चित्रपटाकडे पाहिले. या दिग्दर्शकांचे मार्गदर्शक ठरले श्याम बेनेगल. कारण चित्रपटाला केवळ एक मनोरंजनाचे माध्यम मानणाऱ्यांपैकी ते नव्हते. १९७४ मध्ये त्यांनी तयार केलेला 'अंकुर' चित्रपट पूर्वीच्या सर्व व्याख्या बदलणारा ठरला. चित्रपट निर्मितीच्या दृष्टीने आणि त्याच्या रचनेच्या दृष्टीने अंकुर पूर्णपणे वेगळा ठरला. बर्लिन महोत्सवात या चित्रपटाला पुरस्कार मिळाला आणि ऑस्करसाठी या चित्रपटाची निवडही झाली होती. समीक्षकांनीही या चित्रपटाविषयी भरभरून चर्चा केली. सत्यजित राय यांच्या चित्रकृतींनी बेनेगल प्रभावित असले, तरी त्यांनी चित्रपटाकडे केवळ कलाकृती म्हणून पाहिले नाही, तर त्याला राजकीय आणि सामाजिक वक्तव्याचे माध्यम बनविले.
चित्रपटाला समाजाचा आरसा मानले जाते. बॉलिवूडच्या मुख्य प्रवाहातील चित्रपटांमधून समाजातील कल्पनाशक्ती निश्चित दिसली. मात्र, कलात्मक चित्रपट प्रेक्षकांना अशा दुनियेत घेऊन गेले, जिथे कॅमेरा फारसा पोहोचला नव्हता, ज्या जीवनाकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात होते. या समांतर चित्रपटांचा प्रारंभ सत्यजित राय यांच्यामुळे झाला, परंतु दीर्घकाळ ही पालखी बेनेगल यांच्याच खांद्यावर राहिली. समाजाला त्यांनी केवळ वास्तव दाखविले असे नव्हे, तर ते उत्कटपणे दाखविणारे कलावंतही त्यांनी घडविले. समाजातील प्रवाहाबाहेरच्या माणसांना पडद्यावर आणण्याबरोबरच या चित्रपटांनी समाजातील कुप्रथाही चव्हाट्यावर आणल्या.
१९३४ मध्ये आंध्र प्रदेशात जन्माला आलेल्या बेनेगल यांचे चित्रपटाशी जुने नाते होते. दिग्दर्शक, अभिनेते गुरुदत्त यांची आजी आणि बेनेगल यांची आजी या सख्या बहिणी होत. बॉलिवूडमध्ये पदार्पणासाठी एवढे पुरेसे होते, तरीही बेनेगल यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात जाहिरातीच्या फिल्मसाठी स्क्रिप्ट रायटर म्हणून केली. पहिला चित्रपट तयार करण्यापूर्वी त्यांनी ९०० ॲड फिल्म्स केलेल्या होत्या. १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला नसीरुद्दीन शाह, शबाना आझमी, स्मिता पाटील यांच्यासारख्या ताकदीच्या अभिनेत्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात बेनेगल यांच्या दिग्दर्शनाद्वारेच केली आणि त्यांची ताकद चित्रपटसृष्टीला उमगली. समाजात बंड करून उठणाऱ्या महिलेची कहाणी बेनेगल यांनी सरदारी 'बेगम' चित्रपटात रेखाटली. मम्मो, सरदारी बेगम, जुबैदा हे चित्रपट मुस्लिम महिलांच्या सद्यःस्थितीविषयी खुली चर्चा घडवून आणणारे ठरले.
भारतीय चित्रपटासमोर मोठी आव्हाने उभी राहिली होती. समांतर चित्रपटांसाठी पैसा गोळा करणे दुरापास्त होते. कुणी पैसा पुरविला, तर त्याला अपेक्षित बदल चित्रपटात करताना तत्त्वांशी तडजोड करण्याची वेळ येत असे. भारतात नवचित्रपटाच्या पायाभरणीचा हा कालखंड होता. या नवचित्रपटाला चेहरा देण्याचे श्रेय बेनेगल यांनाच जाते. सिद्धांतांशी तडजोड न करता त्यांनी हे करून दाखविले. त्यासाठी को-ऑपरेटिव्ह फंडिंगची संकल्पना त्यांनी मांडली आणि मंथन नावाच्या चित्रपटात ती वास्तवात उतरवून दाखविली. हा चित्रपटदुधाचा व्यापार करणाऱ्या छोट्या गावांवर आधारित होता. या चित्रपटासाठी पाच लाख गावकऱ्यांनी प्रत्येकी दोन रुपये वर्गणी दिली. जेव्हा चित्रपट प्रदर्शित झाला, तेव्हा ही मंडळी तिकिटे काढून तो पाहायला आली. समाजातील वंचित घटकांना पडद्यावर आणण्यासाठी त्यांनी वापरलेली ही युक्ती खूपच चर्चेत राहिली. अंकुर, निशांत अशा चित्रपटांमधून त्यांनी महिलांच्या दयनीय स्थितीचे चित्रण केले, तर दुसरीकडे 'भूमिका' चित्रपटात असमंजस महिलेचे पात्रही तितक्याच ताकदीने रेखाटले. 'अंतर्नाद' चित्रपटाच्या माध्यमातून मच्छिमारांच्या समस्यांचे दर्शन त्यांनी घडविले. दलित समूहांमध्ये समान अधिकारांच्या मागणीसाठी चेतना जागृत करण्याचे काम त्यांनी 'समर' या चित्रपटाद्वारे केले. महिलांच्या अधिकारांविषयी खुलेपणाने भाष्य करणारा त्यांचा 'हरी-भरी' हा चित्रपटही चर्चेत राहिला.
केवळ चित्रपटसृष्टीतच नव्हे तर छोट्या पडद्यावरही बेनेगल यांनी असेच प्रयोग केले. रामायण, महाभारत यांसारख्या झगमगाटी मालिकांनी टीव्हीचा पडदा व्यापलेला असतानाच सरकारने भारताचा इतिहास लोकांसमोर आणण्याचा निर्णय घेतला, तेव्हा बेनेगल यांचीच त्यासाठी निवड करण्यात आली. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी तुरुंगात लिहिलेल्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या पुस्तकाच्या आधारे त्यांनी भारत एक खोज या नावाने मालिका तयार केली. भारतीय दूरचित्रवाणीच्या इतिहासात हे एक महत्त्वाचे वळण मानले जाते. चित्रपट समाज बदलू शकत नाहीत, परंतु अभिव्यक्तीचे आणि वंचित घटकांकडे लक्ष वेधण्याचे ते एक प्रभावी माध्यम ठरते, हे बेनेगल यांनी अनुभवाने सिद्ध केले. हिंसाचार, नाचगाणी आणि सुमार अभिनयाने भरलेल्या मसालापटांच्या गर्दीत बेनेगल यांच्यासारखे मोजके दिग्दर्शक उठून दिसतात, ते त्यांनी चित्रपट माध्यमाच्या केलेल्या प्रभावी हाताळणीमुळे आणि चित्रपटांना दिशा देण्याच्या केलेल्या प्रयत्नांमुळे. सध्या कलात्मक चित्रपट आणि व्यावसायिक चित्रपट यांच्यातील अंतर घटते आहे, असे म्हटले जाते. काही बाबतीत ते खरेही आहे. परंतु अभिरुची घडविण्यासाठी ज्यांनी प्रयत्न केले आणि त्यासाठी खस्ता खाल्ल्या त्यांच्या तपश्चर्येचेच हे फलित आहे, हे निश्चित. श्याम बेनेगल हे त्यापैकी महत्त्वाचे दिग्दर्शक होते. त्यांच्या निधनाने एका महान दिग्दर्शकाला सिनेसृष्टी आणि भारतीय समाजमानस कायमचे मुकले आहे. ◆◆◆



## पुन्हा दिग्दर्शकाच्या भूमिकेत


अभिनेता, लेखक, दिग्दर्शक आणि निर्माता प्रसाद ओकच्या 'धर्मवीर २' चित्रपटाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. यात आनंद दिघे यांची भूमिका त्याने उत्तमरित्या साकारली होती. यातील त्याच्या अभिनयाचे देखील अनेकांकडून कौतुक करण्यात आले होते. यातच आता नव्या वर्षात एका नवीन चित्रपटाचे प्रसाद दिग्दर्शन करताना पाहायला मिळणार आहे. 'सुशीला सुजीत' या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसाद ओक करणार आहे. 'सुशीला-सुजीत'ची कथा देखील प्रसाद ओकने लिहिली आहे.
दिग्दर्शक आणि कथा लेखन अशी दुहेरी भूमिका सुशीला ह्न सुजीत मध्ये प्रसाद साकारताना दिसणार आहे. हा चित्रपट १८ एप्रिल २०२५ ला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यात स्वप्निल जोशी आणि सोनाली कुलकर्णी यांच्या मुख्य भूमिका आहे. यात सुजितच्या भूमिकेत स्वप्निल जोशी आणि सुशीलाची भूमिका सोनाली कुलकर्णी करणार असल्याचं पोस्टरवरुन स्पष्ट झाले आहे. या पोस्टरमध्ये स्वप्निल आणि सोनाली दरवाजाच्या की होलमधून डोकावून पाहाताना आश्चर्यचकित झालेले दिसतात. या चित्रपटाची निर्मिती स्वप्निल जोशी, प्रसाद ओक, मंजिरी ओक, संजय मेमाणे आणि निलेश राठी करत आहेत. याशिवाय प्रसाद 'जिलबी' या सस्पेन्स थ्रिलर चित्रपटात देखील दिसणार आहे. यात तो एका उद्योगपतीची भूमिका साकारणार आहे. १७ जानेवारी २०२५ ला 'जिलबी' सिनेमा प्रदर्शित होणार आहे. ◆◆◆




## चार वर्षांची प्रतिक्षा संपली!

२०२० मध्ये ओटीटी प्लॅटफॉर्म ॲमेझॉन प्राइम व्हीडिओवर लाँच झालेल्या 'पाताल लोक' या सीरिजला प्रेक्षकांचा जबरदस्त प्रतिसाद मिळाला होता. तेव्हापासूनच या सीरिजचा दुसरा सीझन कधी सुरू होणार याबाबत सातत्याने प्रेक्षकांकडून विचारणा केली जात होती.
आता ४ वर्षांनी प्रेक्षकांची प्रतिक्षा संपणार आहे. काही दिवसांपूर्वीच सीरिजच्या सीझन २ चा प्रोमो समोर आला होता. आता पाताल लोक २ च्या रिलीजची अधिकृत तारीख समोर आली आहे.
या लोकप्रिय सीरिजचा दुसरा भाग १७ जानेवारी २०२५ ला प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. पहिल्या सीझनप्रमाणेच हा दुसरा सीझन देखील प्राइम व्हीडिओ या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रेक्षकांना पाहायला मिळेल. पहिल्या सीझनमध्ये जयदीप अहलावत, इश्वाक सिंग आणि अभिषेक बॅनर्जी यांच्या प्रमुख भूमिका होत्या. सीरिजच्या पहिल्या सीझनमध्ये जयदीप अहलावत यांनी इन्स्पेक्टर हातीराम चौधरी आणि इश्वाक सिंग यांनी कॉन्स्टेबल अन्सारी यांची भूमिका साकारली होती. दुसऱ्या सीझनमध्ये या कलाकारांसोबतच तिलोत्तमा शोम, नागेश कुकुनूर आणि जाह्नू बरुआ सारखे नवीन चेहरे देखील दिसतील. पहिल्या सीझनला प्रेक्षकांसह समीक्षकांची देखील दाद मिळाली होती. याशिवाय, सीरिजला अनेक पुरस्कारही मिळाले होते. पहिल्या सीझन एकूण ९ भागांमध्ये रिलीज झाला होता. त्यामुळे दुसऱ्या सीझनमध्ये देखील ९ भाग असण्याची शक्यता आहे. दुसऱ्या सीझनचे दिग्दर्शन अविनाश अरुण धावरे यांनी केले आहे. प्रेक्षक आता या सीरिजच्या ट्रेलरची मागणी करत असून, १७ जानेवारीला येणाऱ्या दुसऱ्या सीझनमध्ये नवीन काय पाहायला मिळेल, याची उत्सुकता आहे. ◆◆◆

## अर्जुनचा भूतकाळावर



बॉलिवूड अभिनेता आणि कपूर घराण्याचा मुलगा अर्जुन कपूरला त्याच्या आडनावामुळे अनेक गोष्टींचा सामना करावा लागला आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत त्याने स्वतः ही गोष्ट सांगितली. यावेळी तो त्याच्या वाईट भूतकाळाबद्दलही बोलला. आईच्या गैरहजेरीपासून आई-वडिलांच्या घटस्फोटापर्यंत सर्व गोष्टींबद्दल तो मोकळेपणाने बोलला, एवढेच नाही तर मलायका अरोराच्या ब्रेकअपनंतरही त्याच्या आयुष्यात नेमकं काय घडलं यावर देखील तो खूपच काही बोलला.
एका प्रसिद्ध पॉडकास्टमध्ये अर्जुन कपूरने त्याचा भूतकाळ, कुटुंब, प्रेम आणि चित्रपटांबद्दल सांगितले. 'कपूर' या आडनावामुळे आपल्याला कमी लेखले जात असल्याचे त्याने सांगितले. असे बरेच लोक होते ज्यांना तो अयशस्वी होऊ इच्छित होता. पण आज त्याची आई हयात असती तर तिला त्याचा नक्कीच अभिमान वाटला असता.
यावेळी अर्जुन कपूरने सांगितले की, 'तो १० वर्षांचा असताना त्याला त्याच्या आई-वडिलांच्या घटस्फोटाचा सामना करावा लागला. वडील बोनी कपूर हे बॉलिवूडच्या दिवंगत श्रीदेवीच्या प्रेमात होते. अर्जुन कपूर म्हणाला, 'मी १० वर्षांचा असताना माझ्या आई-वडिलांचा घटस्फोट झाला. ते मला वाचवेल असे वाटले नव्हते. पण खऱ्या आयुष्यात मी या सगळ्यातून जात होतो, त्यामुळे त्याचा परिणाम झाला. ते माझ्या मनाला खूप लागलं. आज जेव्हा मी मागे वळून पाहतो तेव्हा अनेक गोष्टी दिसतात'
अर्जुन कपूरनेही वडिलांसोबतच्या नात्याबद्दल सांगितले. तो म्हणाला, 'उदाहरणार्थ, माझे वडील त्यावेळी दोन मोठ्या चित्रपटांमध्ये व्यस्त होते. त्यांच्यावर सुद्धा खूप दबाव होता. त्यामुळे आमचे नाते सामान्य नव्हते. ते घरी यायचे आणि मला शाळेत सोडायचा आणि पुन्हा घरी घेऊन सोडायचे. त्यांनी प्रयत्न केला नाही असे नाही. असं देखील तो यावेळी बोलला.
वडील बोनी कपूर यांच्या श्रीदेवीसोबतच्या लग्नावर अर्जुन कपूर म्हणाला, 'मला लवकरच जबाबदारी वाटू लागली. लवकर परिपक्व. कारण मला माझ्या आई-वडिलांसोबतचे नाते तुटायचे नव्हते. म्हणून मी गोष्टी समजून घेण्याचा प्रयत्न केला. ते खूश होते त्यामुळे मलाही काही त्रास झाला नाही. लहान वयात मी खूप काही शिकलो. ठीक आहे, जे काही केले आहे ते केले आहे. अश्या अनेक गोष्टी यावेळी अभिनेत्यानं बोलावून दाखवल्या. याच मुलाखतीत अर्जुन कपूरने मलायका अरोरासोबत ब्रेकअप झाल्यानंतर कसा काळ होता आणि तिच्या वडिलांच्या मृत्यूची बातमी कळली तेव्हा त्याने कशी साथ दिली या प्रश्नाचे उत्तरही दिले. तो म्हणाला, 'जेव्हा बाबा, खुशी आणि जान्हवी कपूरसोबत घडले तेव्हाही मी स्वत:ला रोखू शकलो नाही. मलायकाच्या वडिलांबद्दलही ऐकून मी स्वतःला रोखू शकलो नाही. मी एक भावनिक बंध निर्माण केला आहे. माझा त्यावर विश्वास आहे. ते मला बोलावतील आणि मी जाईन. वाईट काळात मी साथ देईन. जेव्हा मी एखाद्याशी कनेक्ट होतो तेव्हा मी त्यांच्याशी जोडतो. सदैव साथ देतो. ◆◆◆

## जोडीदाराबाबत तेजश्री उवाच



मराठी चित्रपटसृष्टीमध्ये सध्या चांगल्या विषयांवर आधारित चित्रपट येताना दिसत आहेत. सध्या असाच एक वेगळ्या धाटणीचा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून सुबोध भावे आणि तेजश्री प्रधान हे पहिल्यांदाच एकत्र काम करताना दिसणार आहेत. तेजश्री प्रधान आणि सुबोध भावे यांच्या या चित्रपटाचे नाव 'हॅशटॅग तदेव लग्नम' असे आहे. आताच्या तरुणांमधील लग्ना संबंधित असलेली चर्चा आणि नपटणारे विचार असा भन्नाट विषय घेऊन तरुणाईला आणि त्यांच्या कुटुंबाला भेटण्यासाठी 'हॅशटॅग तदेव लग्नम' सज्ज झाला आहे. दरम्यान, सिनेमाविषयी बोलताना अभिनेत्री तेजश्री प्रधान हिने स्वतःचे लग्नाविषयी असणारे मत आणि काही अनुभव बोलून दाखवले आहेत. एका मुलाखतीमध्ये तेजश्रीने लग्नाविषयीचं तिचं मत व्यक्त करताना सांगितलं की, मला तर माझ्या २५तच लग्न करायचं ही, मी केलंही होतं. पण देवाचे काहीतरी वेगळे प्लॅन्स होते. पण माझ्या आताच्या वयातही सगळं छान आहे. आज जर मी जोडीदार निवडण्याचं ठरवलं तर एका वेगळ्या दृष्टीकोनातून मला त्याकडे पाहता येईल. मी लग्न केलं तेव्हाही माझ्या आईवडिलांनी अजिबात जबरदस्ती केली नाही. मला आयुष्यात लहानपणापासून लग्नच करायचं होतं. मला लग्न करायचं अशाच मूडमध्ये होते मी. मला माझ्या पंचवीशीत लग्न करायचंच होतं. मला होममेकरच व्हायचं होतं. असं ती यावेळी म्हणाली.
दरम्यान, अभिनेत्री तेजश्री ही 'होणार सून मी ह्या घरची' या मालिकेतून घरांघरांत पोहचली. त्याचवेळी तिने तिचा सहकलाकार शशांक केतकरसोबत आयुष्यभराची गाठही बांधली. पण वर्षभरातच शशांक-तेजश्रीचा संसार मोडला आणि ते विभक्त झाले. त्यानंतर शशांकने त्याची मैत्रीण प्रियांका ढवळेसोबत लग्नगाठ बांधली, तर तेजश्री मात्र अद्यापही सिंगल आहे. तेजश्री ही सोषसील मीडियावर मोठ्या परमनंट सक्रिय असते, तिच्या नव्या प्रोजेक्टची माहिती देखील चाहत्यांना देते असते. तेजश्रीच्या सोशल मीडियावरील पोस्ट अनेकांचे लक्ष वेधतात. तेजश्रीला इन्स्टाग्रामवर १.२ मिलियन फॉलोवर्स आहेत.

## प्रियंकाबाबत गौप्यस्फोट



अभिनेत्री प्रियंका चोप्राने एकापेक्षा एक सुपरहिट हिंदी चित्रपट दिले आहेत. केवळ बॉलिवूडच नाही तर हॉलिवूडमध्ये देखील तिने आपल्या कामाद्वारे एकवेळी छाप पाडली आहे. मात्र, एकवेळ अशी आली होती, जेव्हा प्रियंका बॉलिवूडला रामराम ठोकून परत घरी परतणार होती. याबाबत प्रसिद्ध दिग्दर्शक अनिल शर्मा यांनी खुलासा केला आहे.
'गदर' चित्रपटाचे दिग्दर्शक अनिल शर्मा यांनी एका मुलाखतीमध्ये प्रियंका चोप्रा करिअरच्या सुरुवातीला मुंबई सोडून गावी बरेलीला परतणार होती असा खुलासा केला आहे. अनिल शर्मा यांनी सांगितले की, प्रियंकाच्या नाकाचे चुकीचे ऑपरेशन झाले होते. यामुळे तिच्या हातातून अनेक प्रोजेक्ट गेले. त्यामुळे ती मुंबई सोडून बरेली परतणार होती. प्रियंकाच्या करिअरच्या सुरुवातीला अभिनेत्री ज्यूलिया रॉबर्ट्स सारखे दिसण्यासाठी नाकाचे ऑपरेशन केल्याच्या चर्चा समोर आल्या होत्या. मात्र, शर्मा यांनी सांगितले की, हे एक मेडिकल ऑपरेशन होते, जे चुकीचे झाले. यात तिची कोणतीही चुक नव्हती. त्यावेळी चित्रपटासाठी तिला ५ लाख रुपये टोकन देखील दिले होते. ती ही रक्कम परत देण्यासाठी आली होती. मात्र, मी तिला हे पैसे तिच्याकडेच ठेवायला सांगितले व ओरडलो देखील.
अनेक प्रोजेक्ट हातातून गेल्याने प्रियंका मुंबई सोडणार होती. मात्र, यावेळी अनिल शर्मा यांनी तिची साथ दिली. अनिल यांनी पुढे सांगितले की, प्रियंकासाठी वायआरएफमध्ये काम करणाऱ्या एका प्रसिद्ध मेकअप आर्टिस्टला फोन केला आणि तिचे नाक दुरुस्त करण्यासाठी मदत करण्यास सांगितले. त्यानंतर त्यांनी नीता लुल्ला यांच्यासोबत कॉस्टिमवर काम केले व तिची स्क्रीन टेस्ट देखील घेतली. विशेष म्हणजे ही स्क्रीन टेस्ट सर्वांना आवडली देखील.
दरम्यान, प्रियंकाने 'थमिजान' या तमिळ चित्रपटाद्वारे करिअरची सुरुवात केली होती. तर अनिल शर्मा यांच्या 'द हीरो- लव स्टोरी ऑफ ए स्पाय' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये डेब्यू केला होता. या चित्रपटात सनी देओल, प्रीती झिंटा आणि अमरीश पुरी यांचीही प्रमूख भूमिका होती. ◆◆◆

राजकीय वातावरण तापले : आरोपींना अद्याप अटक नाही

# संतोष देशमुख प्रकरणात छत्रपती संभाजीराजेंची उडी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सातारा :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडला अद्याप अटक न झाल्याने सर्वपक्षीय नेत्यांनी बीडमध्ये मूकमोर्चा काढला. या मोर्चात सहभागी झालेल्या छत्रपती संभाजीराजे यांनी थेट मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. वाल्मिक कराड कुठे आहेत, हे धनंजय मुंडेना माहिती नसणे न पटणारे आहे. स्वत: पंकजा मुंडे यांनी एका सभेत वााल्मिक कराडशिवाय धनंजय मुंडे यांचा पान हालत नसल्याचे वक्तव्य केले होते, असेही संभाजीराजे यांनी म्हटले आहे.

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाला १९ दिवस झाले आहेत. मात्र, हत्येचा मुख्यसूत्रधार वाल्मिक कराड याला अद्यापही अटक झालेली नाही.त्यामुळे फरार आरोपीला अटक करण्याची मागणी करत संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ आज बीड जिल्ह्यात सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात सहभागी झालेले संभाजीराजे यांनी अनेक संतप्त सवाल उपस्थित केले.

पुढे संभाजीराजे म्हणाले की, 'मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अंत्यत क्रूर पद्धतीने हत्या झाली. १९ दिवस झाले पण अजूनही आरोपींना अटक झालेली नाही. वाल्मिक कराडला संरक्षण देणाऱ्या तिथल्या मंत्र्याचा राजीनामा का घेतला नाही? त्यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी का झाली नाही? सरकारने एसआयटी नेमल्यानंतर पुढे काय झाले?' असाही सवाल त्यांनी उपस्थित केला.

### तो २० खून करणारा वाल्या!

● वाल्मिक कराड यांच्या अटकेसाठी बीड जिल्ह्यात आज सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यासह बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेते आमदार, खासदार सहभागी झाले होते. या मोर्चावेळी माध्यमांशी बोलताना आव्हाड यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करत वाल्मिक कराडवरही गंभीर आरोप केले. यांच्यासारख्यामुळे आमची जात बदनाम होतेय, त्याला वाल्मीक काय म्हणता तो २० खून करणारा वाल्या असल्याचं आव्हाड यांनी म्हटले आहे.

● आव्हाड म्हणाले की, बीडमध्ये सर्व जातीच्या लोकांनी प्रतिनिधित्व केले मात्र कधी जात शिवली नाही. हा शिवराज बांगर याला कोण कोण ओळखता. याचे घरचे हायकोर्ट झाले आहे. बापू आंधळेचा खून कोणी केला. पोलीस प्रशासन व इथल्या पालकमंत्र्यांनी बीड जिल्ह्याचा सत्यानाश केला.



### कोणालाही पाळू नका, नाहीतर तोंडघशी पडाल!

● जरांगे पाटील म्हणाले की, 'राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी या घटनेच्या तपासात हालगर्जीपणा करू नये. जातीवाद पसरेल असे काही करू नये. काही लोक गुंडगिरी करत आहेत. लोकांना बंदूका दाखवू लागले, शिवीगाळ करू लागले, पोलिसांना आरेरावी करू लागले, अशा घटनांना बिमोड करण्याचे सरकारचे काम आहे. मुख्यमंत्र्यांनी त्यांना संभाळण्याचे काम करू नये. अन्यथा हे लोक बाजूला होतील आणि तुम्ही तोंडघशी पडताल. यांना पाठीशी घालू नका, अन्यथा तुम्हाला पच्छाताप होईल. तुम्ही आरोपींना अटक करा.हे प्रकरणाची तपासणी करून त्यांना तुरुंगात टाका. या घटनेला १९ दिवस उलटले तरी अजूनही आरोपी सापडत नाहीत, याचा अर्थ मुख्यमंत्री त्यांना पाठीशी तर घालत नाही ना?' असा प्रश्न जरांगे यांनी उपस्थित केला.

## » Selected

### साकीनाका परिसरातील वाजिद अली कंपाऊंडमध्ये भीषण आग

**मुंबई** : मुंबई कुर्ला पश्चिमेतील साकीनाका परिसरातील खैरानी रोडवरील वाजिद अली कंपाऊंडमध्ये भीषण आग लागली. या आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम सुरू आहे. या आगीच्या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली आहे. मुंबईतील साकीनाका परिसरात शनिवारी सकाळी ६ वाजताच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, वाजिद अली कंपाऊंडमधील गोदामांना अचानक भीषण आग लागली. भंगार साहित्य व प्लास्टिक असल्याने आगीने काही वेळातच भीषण रूप धारण केले. अपघाताची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या १० गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम सुरू आहे. या आगीत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही.

### तासवडे पथकर नाक्यावर १० लाखांचा गुटखा जप्त

**कराड** : पुणे-बंगळूरु महामार्गावरील तासवडे पथकर नाक्यावर तळबीड पोलिसांनी टेम्पोसह १० लाख ३० हजार रुपयांचा गुटखा पकडला. तर विकास वसंत जाधव (३५, रा. गणेश चौक, कोडोली, सातारा) याला अटक केली. पोलिसांच्या माहितीनुसार महामार्गावर रात्रीच्या सुमारास निपाणी (कर्नाटक) येथून टेम्पो गुटखा घेऊन जाणार असल्याची माहिती तळबीडचे प्रभारी किरण भोसले यांना मिळाली होती. त्यानुसार तासवडे पथकर नाक्यावर नाकाबंदी करून टेम्पोची झडती घेतली असता त्यामध्ये १० लाख ३० हजार रुपये किमतीचा गुटखा मिळून आला. पोलिसांनी टेम्पोसह १० लाख ३० हजार रुपये किमतीचा गुटखा जप्त केला आहे. तळबीड पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित विकास जाधवला पोलिसांनी अटक केली आहे.

### घराला आग लावून पती-पत्नीला जिवंत जाळण्याचा प्रयत्न

**भिवंडी** : शहरातील निजामपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत कुरेशी नगर भागात घरात पती-पत्नी झोपले असताना त्या घराला आग लावून जाळून मारण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ज्यामध्ये पती-पत्नी फरिन व पती आसिफ कुरेशी हे भाजल्याने जखमी झाले आहेत. या विषयी अधिक माहिती अशी की, फरिन आसिफ कुरेशी व पती आसिफ कुरैशी असे दोघे झोपले होते. मध्यरात्री सुमारे 3 ते 3.30 वाजण्याच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने घराच्या दरवाज्यावर पेट्रोल टाकून आग लावून फरार झाले. यावेळी हल्लेखोराने घराच्या मागील दरवाजाची बाहेरून कडी लावली होती. आगीने पेट घेत घरात धूर जमा झाल्याने झोपेत असलेले दोघे पती-पत्नी जागे झाले. त्यांनी आरडा ओरड करीत दुसऱ्या दरवाजाने बाहेर पडण्याचा प्रयत्न केला तर तो दरवाजा बाहेरून बंद असल्याने दोघांनी आरडाओरड केल्याने शेजारी जागे होऊन घटनास्थळी धाव घेऊन आग विझविली. या दरम्यान पती-पत्नी हे आग विझविण्याचा प्रयत्न भाजल्याने जखमी झाले आहेत.

### मॉडेल स्कूलचा अनोखा उपक्रम

**सांगली** : जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत 'माझी शाळा आदर्श शाळा' अंतर्गत मॉडेल स्कूल हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमामुळे अनेक शाळांचे रूप पालटले आहे. या उपक्रमाची राज्यभर चर्चा सुरू आहे. शिक्षणमंत्री दादा भुसे यांनाही उपक्रमाची भुरळ पडली. शिक्षणाधिकारी मोहन गायकवाड यांच्याकडून मंत्री भुसे यांनी याबाबत माहिती घेतली. तसेच हा उपक्रम राज्यभर राबवण्यात येणार असल्याचे संकेत मिळाल्याची माहिती गायकवाड यांनी दिली.

मंत्री भुसे यांनी मालेगाव तालुक्यातील अनेक शाळांना भेटी दिल्या. विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती यांच्याशी संवाद साधला. सर्वसामान्य, गोरगरीब, बहुजनांच्या मुलांसाठी सुरू केलेले शैक्षणिक उपक्रम पुढे नेऊन एक पॅटर्न तयार करावा. राज्याला आदर्श अशा शाळा निर्माण होतील, असा प्रयत्न त्यांनी सुरू केला आहे.

## 'आप'च्या महिला सन्मान योजनेवरून वादंग

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी आम आदमी पार्टीने महिला सन्मान योजना सादर केली आहे. मध्य प्रदेश व महाराष्ट्र सरकारच्या पार्श्वभूमीवर दिल्लीतील सरकारने सादर केलेली ही योजना वादात अडकली आहे. या योजनेवरून दिल्लीत मोठा संभ्रम निर्माण झाल्याचं दिसत आहे. एकीकडे सरकारकडून या योजनेसाठी महिलांची नोंदणी केली जात असताना दुसरीकडे सरकारच्याच महिला व बालकल्याण विभागाने म्हटलं आहे की "अशी कोणतीही योजना राबवली जात नाहीये". काँग्रेस व भारतीय जनता पार्टीने या योजनेबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. तर, दिल्ली प्रशासनाने यासंदर्भात जाहिरात प्रसिद्ध करून म्हटलं आहे की दिल्ली सरकारने अशी कोणतीही योजना जाहीर केलेली नाही. दरम्यान, दिल्लीचे



राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी याप्रकरणी तपास करण्याचे आदेश दिले आहेत.

दुसऱ्या बाजूला, आम आदमी पार्टीने म्हटलं आहे की या योजनेअंतर्गत १८ वर्षांवरील सर्व पात्र महिलांना दर महिन्याला १,००० रुपये दिले जातील. तसेच आगामी दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पार्टी विजयी झाल्यास महिलांना दिली जाणारी रक्कम १,००० रुपयांवरून वाढवून २,१०० रुपये केली जाईल. त्यामुळे पालिकेने अंधेरीतील रस्त्यासंदर्भात संबंधित कंत्राटदाराला आणि गुणवत्ता देखरेख संस्थेलाही प्रत्येकी दीड लाखाचा दंड ठोठावला. अशाच प्रकारे शहरात आणि उपनगरात विविध कामांसाठी पालिकेकडून कंत्राटदारांना आतापर्यंत ५० लाखांचा दंड ठोठावल्याची माहिती पुढे आली आहे.

दिल्लीचे एलजी व्ही. के. सक्सेना यांच्या प्रधान सचिवांनी दिल्लीच्या मुख्य सचिवांना व दिल्ली पोलीस आयुक्तांना पत्र पाठवलं आहे. या पत्रात त्यांनी म्हटलं आहे की आम आदमी पार्टीच्या वेगवेगळ्या घोषणा ऐकायला मिळत आहेत. या योजनांतर्गत १८ वर्षांवरील सर्व पात्र महिलांना दर महिन्याला १,००० रुपये दिले जातील. तसेच आगामी २०२५ च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पार्टी विजयी झाल्यास महिलांना दिली जाणारी रक्कम १,००० रुपयांवरून वाढवून २,१०० रुपये केली जाईल. याबद्दल सरकारने स्पष्टीकरण द्यावं. तसेच या योजनेच्या तपासाचे आदेश देण्यात आले आहेत.

## ७ लाखांसाठी मुकादम बहीण भावाचे अपहरण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अक्कलकोट :** सात लाखांसाठी मुकादम बहिण भावाचे अपहरण करण्यात आले. व्हिडिओ कॉलद्वारे ७ लाखांची मागणी करण्यात आली. पैसे न दिल्यास तुझ्या पतीला खलास करून नदीत टाकतो, अशी धमकी देण्यात आल्याची माहिती धमाबाई पवार यांनी दिली आहे. तसेच या घटनेकडे अक्कलकोट दक्षिण पोलिसांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सजनू पवार आणि त्यांची बहीण यशोदा काळे हे मजूर पुरविण्याचे काम करतात. मजूर पुरवण्यासाठी कर्नाटकातील अफजलपूर येथील ऊस तोडण्यासाठी मजूर पाठवतो. यासाठी त्यांनी शिवबा हट्टी यांच्याकडून 2 लाख रुपये घेतले. परंतु मजूर न आल्याने रक्कम ते देऊ शकले नाहीत. याचा राग मनात



धरून शिवबा हट्टी आणि त्यांच्या इतर साथीदारांनी मिळून सजनू पवार, यशोदा काळे यांचे घरातून अपहरण केले. फिर्यादी धमाबाई पवार या अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेले असता त्यांची तक्रार घेतली नाही. पोलीस अधीक्षकांना भेटल्यानंतर त्यांची तक्रार घेण्यात आली. परंतु, अद्याप अपहरण होऊन पाच ते सहा दिवस झाले तरी देखील आरोपींना अटक केलेली नाही. या उलट आरोपी मात्र धमाबाई पवार यांना व्हिडिओ कॉल करून तिचे पती सजनू पवार यास झाडाला साखळीने बांधून ठेवल्याचा व्हिडिओ दाखवत आहेत.

## नांदणी महामहोत्सवाला मुख्यमंत्री फडणवीस येणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**जयसिंगपूर** : नांदणी (ता. शिरोळ) येथे एक ते नऊ जानेवारी या कालावधीत पंचकल्याणक प्रतिष्ठा व महामस्तकाभिषेक महोत्सव होणार आहे. या महामहोत्सवासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत. आमदार डॉ. राहुल आवाडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी मुंबई येथील सागर निवासस्थानी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन निमंत्रण दिले. यावेळी फडणवीस यांनी महामहोत्सवाला येणार असल्याची ग्वाही दिली आहे.

या भेटीत डॉ. राहुल आवाडे यांनी या महोत्सवाचे धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक महत्त्व विषद करत मुख्यमंत्र्यांना उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले. या महोत्सवामुळे नांदणी परिसरातील सांस्कृतिक परंपरेला नवीन उंची मिळेल, तसेच जैन धर्माच्या पवित्र परंपरेचे दर्शन भाविकांना घडेल.

यावेळी पंचकल्याणक महोत्सव कमिटीचे कार्याध्यक्ष सागर संभूशेटे, राजकुमार सावत्रे, स्वप्निल देसाई, दर्शन टारे तसेच इतर उपस्थित होते. या निमित्ताने महोत्सवाच्या यशस्वितेसाठी विविध योजना आणि तयारीबाबत सविस्तर चर्चा झाली.

## सोहळ्याकरिता येणाऱ्या अनुयायींना सर्व सुविधा पुरविण्याची चोख व्यवस्था करा-मंत्री शिरसाट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पेरणे फाटा येथे १ जानेवारी २०२५ रोजी आयोजित विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याकरीता येणाऱ्या अनुयायींना आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्यासाठी यंत्रणांनी समन्वयाने चोख व्यवस्था करा, असे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिले. दरवर्षी त्याच-त्याच सुविधा पुन्हा कराव्या लागत असल्याने कायमस्वरुपी सुविधा तयार करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

हवेली तालुक्यातील मोजै पेरणे फाटा येथे होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमाच्या पूर्वतयारीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस सामाजिक न्याय राज्यमंत्री श्रीमती माधुरी मिसाळ, प्र. समाज कल्याण आयुक्त प्रवीण पुरी, प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे



मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, पुणे शहर पोलीस सह आयुक्त रंजन कुमार शर्मा, पिंपरी चिंचवडचे पोलीस सह आयुक्त शशिकांत महावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था तथा बार्टीचे महासंचालक सुनील वारे, समाज कल्याण सहआयुक्त सुरेंद्र पवार, प्रमोद जाधव आदी उपस्थित होते. जिल्हा प्रशासनाने विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या अनुषंगाने केलेल्या तयारीबाबत समाधान व्यक्त करुन मंत्री श्री. शिरसाट म्हणाले, कार्यक्रमासाठी दरवर्षी पार्किंगसाठी खासगी जागा ताब्यात घेणे, सपाटीकरण करणे यावर मोठा खर्च होत असतो.

८ जणांचा मृत्यू, २० जण जखमी

## नाल्यामध्ये बस कोसळून भीषण अपघात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंजाबमधील भटिंडा येथे खाजगी कंपनीच्या बसला भीषण अपघात झाला. या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला असून २० हून अधिक जखमी झाले आहेत. ५० हून अधिक प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या एका खासगी कंपनीच्या बसवरील चालकाचे नियंत्रण सुटून बस घाण पाण्याच्या नाल्यात कोसळली. अपघातातील जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवले. बठिंडा जिल्ह्यात सरदुलगड-बठिंडा रस्त्यावर पावसामुळे एक बस रस्त्यावरून घसरून घाणेरड्या नाल्यात कोसळली. या अपघातात ५ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले. ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेऊन प्रवाशांना वाचविण्यास सुरुवात केली. काही वेळाने एनडीआरएफचे पथकही तेथे पोहोचले. सर्व जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे उपचारादरम्यान आणखी ३ जणांचा मृत्यू झाला.बठिंडाचे आमदार जगरूप सिंह गिल यांनी सांगितले की, या दुर्घटनेत आठ



जणांचा मृत्यू झाला असून २० जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला, तर तिघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. जखमींवर शहीद भाई मणिसिंह रुग्णालयात उपचार सुरू आहेत. वैद्यकीय अधिकाऱ्यांना पूर्ण लक्ष देण्यास सांगण्यात आले आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, मुसळधार पाऊस पडत होता. बस नाल्यात पडण्यापूर्वी पुलावरील रेलिंगला आदळली आणि नंतर थेट नाल्यातकोसळली. आम्ही घटनास्थळी धाव घेऊन प्रवाशांना वाचवण्याचा प्रयत्न केला. आम्ही काही लोकांना वाचवले पण पावसामुळे कामात खूप व्यत्यय निर्माण झाला होता. काही वेळाने एनडीआरएफचे पथक तेथे आले आणि त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.

## अण्णा भाऊ साठे महामंडळाकडून ४८ लाखांचे कर्जवाटप

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाला बीजभांडवल योजनेअंतर्गत २०२४-२५ मध्ये एकूण ८६ कर्जप्रकरणे प्राप्त झाली असून, यापैकी १८ मंजूर प्रकरणांना मंजुरी देण्यात आली. १८ पैकी १६ अर्जदारांना आतापर्यंत ४ टक्के व्याजदराने ४८ लाख ५० हजारांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. नोव्हेंबर महिन्यात महामंडळाला ११ कर्जप्रकरणे प्राप्त झाली. त्यापैकी ४ प्रकरणे मंजूर करण्यात आली. यासाठी बँकेने ११ लाख ५० हजारांची प्रकल्प रक्कम मंजूर केली आहे.

महामंडळाकडून अनुदान स्वरूपात ४० हजार देण्यात येणार असून, बीजभांडवल रक्कम ४ लाख ७९ हजार ७५० इतकी असणार आहे. लोकशाहीर साठे यांच्या नावाने स्थापन महामंडळाद्वारे मातंग समाजअंतर्गत असणाऱ्या १२ पोटजातींमधील लाभार्थ्यांना अर्थसहाय्य करण्यात येते.

### महामंडळाची मुख्य उद्दिष्टे

● मातंग समाजाच्या आर्थिक उन्नतीला चालना देणे, सहाय्य करणे, तंतूकामाच्या व्यवसायात गुंतलेल्या मातंग समाजाला आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे. समाजाच्या कल्याणासाठी शासन, संवैधानिक संस्था, कंपन्या, भागीदारी संस्था किंवा व्यक्ती यांच्या सहयोगाने कृषी विकास कार्यक्रम, कृषी उत्पादनांचे प्रणव प्रक्रिया व त्यांचा पुरवठा, साठा, लघुउद्योग, इमारत, बांधकाम, वाहतूक आणि वैद्यकीय अभियांत्रिकी वास्तुशास्त्र इत्यादी धंदा, व्यापार करण्यासाठी कर्जयोजना किंवा तांत्रिक व्यवस्थापकीय सहाय्य देण्याची तरतूद.

### योजनेसाठी आवश्यक तरतुदी

● अठरा वर्षे पूर्ण केलेले असावे. पन्नास वर्षांपेक्षा जास्त नसावे, अर्जदार हा मातंग समाजाच्या १२ पोटजातीतील असावा. अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाख असावे. अर्जदाराने इतर शासकीय उपक्रमांतून आर्थिक लाभ घेतलेला नसावा.

### अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे अशी...

● जातीचा दाखला, कुटुंबाच्या उत्पन्नाचा दाखला, पासपोर्ट साइजचे दोन फोटो, शैक्षणिक दाखला, रेशनकार्ड झेरॉक्स, व्यवसाय जागेच्या उपलब्धतेचा पुरावा, जागा स्वतःची नसल्यास भाडे पावती करार देणे.

## सागरी महामार्ग तीन वर्षात पूर्ण होणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रायगड :** कोकणच्या विकासात महत्वपूर्ण ठरणाऱ्या सागरी महामार्गावरील आठ पूलांच्या कामाकरिता निधी मंजूर झालेला आहे. त्यांची कामे आता वेगाने होतील. त्यात बरोबर महामार्गाच्या कामाल गती देण्यात येईल. परिणामी सागरी महामार्गाचे काम येत्या तीन वर्षात पूर्ण होईल असा विश्वास रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी अलिबाग येथे पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

दरम्यान मुंबई गोवा महामार्गावरील इंदापूर व माणगांव बायपासचे काम रखडले होते. तेथील भूमीसंपादनाची समस्या दुर झाली आहे. त्यामुळे या दोन्ही बायपासच्या कामांना आता वेग येईल. हे दोन्ही बायपास मार्ग सुरु झाल्यावर सध्या



इंदापूर व माणगांव मधील वाहतूक कोंडीची समस्या पूर्णपणे संपेल व प्रवास वेगवान होईल.येथील सद्यस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेऊन, हे काम वेळेत पूर्ण होण्यासाठी पाठपूरावा करणार असल्याचेही खा.तटकरे यांनी सांगीतले.

याच मार्गाला जोडून पुढे कोकणच्या ग्रिनफिल्ड सागरी महामार्गाची रचना करण्यात आली आहे. यामुळे किनारपट्टीचा प्रवास गतिमान होवू शकणार आहे. हा महामार्ग पूर्ण होण्यासाठी पाच मोठी सागरी पुले बांधावी लागणार आहेत. यामध्ये उरण-रेवस या सागरी पुलाचे काम सुरू झालेले आहे. दुसरे पूल आहे, आगरदांडा-दिवेआगर तर तिसरे पूल आहे हरिहरेश्वर-बाणकोट, चौथेपूल आहे दाभोळ-जयगड या सर्व पूलांना ग्रिनफिल्ड सागरी महामार्गाच्या नव्या रचनेत मंजूरी देण्यात आली आहे.

काँक्रीटच्या रस्त्यांची निकृष्ट दर्जाची कामे

## रस्त्यांची निकृष्ट बांधणी करणाऱ्यांवर कारवाई

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईत विविध रस्त्यांची निकृष्ट बांधणी करणाऱ्या कंत्राटदारांसह रस्त्याच्या कामांवर देखरेख ठेवण्यासाठी नेमलेल्या गुणवत्ता देखरेख संस्थांनाही (क्वालिटी मॅनेजमेंट एजन्सी) मुंबई महापालिकेने ५० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. काँक्रीटच्या रस्त्यांची निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्यांवर यापुढेही कारवाई केली जाणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. मुंबईतील रस्त्यावर पडणारे खड्डे बुजवण्यासाठी



पालिकेकडून कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहेत. त्यानुसार पहिल्या टप्प्यात ३९२ किलोमीटर, तर दुसऱ्या टप्प्यात ३०९ किलोमीटर, असे एकूण मिळून ७०१ किलोमीटर रस्त्यांची कामे सुरू आहेत.

या रस्त्यांच्या दर्जाबाबत आलेल्या तक्रारीनंतर पहिल्या टप्प्यातील कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी आढळल्या आहेत. रस्त्यांच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी गुणवत्ता देखरेख संस्थांची नेमणूक केलेली असतानाही अनेक ठिकाणी रस्त्यांना तडे गेले आहेत, तर काही ठिकाणी रस्त्यांचा पृष्ठभाग उखडला गेला आहे. त्यातच सांताक्रूझ पश्चिमेतील भार्गव रोड येथील रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे पाहणीतून समोर आले आहे. काँक्रीटीकरण केल्यानंतर तेथे तडे गेल्याचे निदर्शनास आले आहे. या कामाचे परीक्षण आणि कामाच्या दर्जाच्या चौकशीची मागणी आमदार आशीष शेलार यांनी पालिका आयुक्तांकडे केली आहे. तसेच, अंधेरीतील लोखंडवाला परिसरातील अच्युतराव पटवर्धन मार्गावरही रस्त्यांच्या दर्जाबाबत त्रुटी आढळल्या आहेत. त्यामुळे पालिकेने अंधेरीतील रस्त्यासंदर्भात संबंधित कंत्राटदाराला आणि गुणवत्ता देखरेख संस्थेलाही प्रत्येकी दीड लाखाचा दंड ठोठावला. अशाच प्रकारे शहरात आणि उपनगरात विविध कामांसाठी पालिकेकडून कंत्राटदारांना आतापर्यंत ५० लाखांचा दंड ठोठावल्याची माहिती पुढे आली आहे.




'सुरुवातीला मला वाटलं मी त्याला पहिल्या दोन षटकातच ६-७ वेळा बाद करेल, पण क्रिकेट असंच आहे. कधी दिवस चांगला असतो, कधी नसतो. त्यानंतर तुम्हीही कदाचित त्याच व्यक्तीवर टीकाही कराल. क्रिकेट असेच आहे आणि मला वेगवेगळी आव्हानं आवडतात. — जसप्रीत बुमराह

स्टुपिड, स्टुपिड, स्टुपिड... तिथे दोन खेळाडू होते आणि तरीही तू तो फटका मारला. याआधीचा तुझा फटका चुकला होता आणि आता बघ तुझा झेल कुठे पकडला गेला. तू विकेट फेकलीस. हा माझा नैसर्गिक खेळ आहे, असे तू म्हणू शकत नाहीस. — सुनिल गावस्कर



### भारत ३५८/९ : रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर यांनी मैदान गाजवलं

# ड्रॉसाठी भारत 'रेड्डी'

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**मेलबर्न :** नितीश कुमार रेड्डीने ८व्या क्रमांकावर फलंदाजीला येताना भारतासाठी बॉर्डर गावस्कर ट्रॉफीच्या चौथ्या कसोटीत शतकी खेळी केली. नितीशचे हे कसोटीतील पहिले शतक ठरले आणि लेकाचं मेलबर्नवर शतक पाहून त्याचे वडील ढसाढसा रडले. ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांचा समाचार घेताना नितीशने भारतावरील फॉलो ऑनचे संकट टाळले. त्याला नवव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या वॉशिंग्टन सुंदरचीसाथ मिळाली. भारताच्या या दोन्ही खेळाडूंनी कसोटी क्रिकेटच्या १४७ वर्षांच्या इतिहासात आतापर्यंत कुणालाच न जमलेला पराक्रम केला आहे.

ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावातील ४७४ धावांचा पाठलाग करताना भारताला २२१ धावांवर ७ धक्के बसले होते. नितीश व वॉशिंग्ट ही जोडी मैदानावर उभी राहिली आणि १२७ धावांची विक्रमी भागीदारी केली. वॉशिंग्टन १६२ चेंडूंत १ चौकारांच्या मदतीने ५० धावा करून माघारी परतला. जसप्रीत बुमराह शून्यावर बाद झाल्याने नितीशचे शतक होतंय की नाही अशी धाकधुक लागली होती. पण, मोहम्मद सिराजने ७ चेंडू खेळून नितीशला स्ट्राईक दिली. ९९ धावांवर असताना नितीशने मिड ऑनच्या फिल्डरच्या डोक्यावरून चौकार खेचला आणि पहिले आंतरराष्ट्रीय शतक पूर्ण केले.

८व्या क्रमांकावर शतक झळकावणारा तो भारताचा चौथा फलंदाज ठरला. यापूर्वी १९९० मध्ये कपिल देव, २००२ मध्ये अजित आगरकर आणि २००७ मध्ये अनिल कुंबळे यांनी इंग्लंडमध्ये शतकी खेळी केली होती. नितीश व वॉशिंग्टन यांची १२७ धावांची भागीदारी ही भारताबाहेरील आठव्या विकेट्ससाठीची तिसरी सर्वोत्तम भागीदारी ठरली. राहुल द्रविड व जवागल श्रीनाथ यांनी १९९९ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध १४४ आणि सचिन तेंडुलकर व हरभजन सिंग यांनी २००८ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध १२९ धावांची भागीदारी केली होती.

नितीश १७६ चेंडूंचा सामना करताना नाबाद १०५ धावा केल्या आहेत आणि ८ व्या व ९व्या क्रमांकाच्या फलंदाजांनी एका डावात प्रत्येकी १५० हून अधिक चेंडूंचा सामना करण्याची ही १४७ वर्षांच्या क्रिकेट इतिहासातील पहिलीच वेळ आहे. असा दावा ब्रॉडकास्टर्सकडून केला गेला आहे. नितीशने आजच्या खेळीत आणखी एक विक्रम नावावर केला. सचिन तेंडुलकर व ऋषभ पंत यांच्यानंतर ऑस्ट्रेलियात कसोटी शतक झळकावणारा नितीश हा तिसरा युवा भारतीय फलंदाज ठरला आहे. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताच्या ९ बाद ३५८ धावा झाल्या आहेत आणि अजूनही ते ११६ धावांनी पिछाडीवर आहेत. नितीश व मोहम्मद सिराज ( २) खेळत आहेत.

### टी-२० क्रिकेट स्पर्धेत

## टाटा कन्स्लटन्सी, इन्फोसिस संघ विजयी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** टीआरपीएस मॅनेजमेंट, अतुल ट्युटोरीयल्स् आणि लायन्स् क्लब पुणे रहाटणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तर्फे पहिल्या 'टीआरपीएस कॉर्पोरेट करंडक' टी-२० क्रिकेट स्पर्धेत टाटा कन्स्लटन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) आणि इन्फोसिस या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी आगेकूच केली.

हिंजेवाडी येथील फोरस्टार मैदानावर झालेल्या सामन्यामध्ये मिन्हाज अली याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर टाटा कन्स्लटन्सी सर्व्हिसेसने एस.एस. अँड सी. इलेव्हनचा ७ गडी राखून सहज पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या एस.एस. अँड सी. इलेव्हनचा डाव ४० धावांवर गडगडला. मिन्हाज अली याने १० धावांमध्ये ४ गडी बाद करून भेदक गोलंदाजी केली. अली याला सागर दुबे आणि दिपक शर्मा यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून योग्य साथ दिली. हे लक्ष्य टीसीएसने ६.१ षटकात व ३ गडी गमावून पूर्ण केले.

संदीप संघई याने केलेल्या १२९ धावांच्या जोरावर इन्फोसिस संघाने बॉश इलेव्हनचा १५२ धावांनी सहज पराभव करून सलग दुसरा विजय नोंदविला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या इन्फोसिसने २० षटकात २६३ धावांचा डोंगर उभा केला. संदीप संघई याने ६३ चेंडूत १६ चौकार आणि ६ षटकारांसह १२९ धावांची खेळी केली. हृषीकेश खांडेकर याने ५५ धावांची आणि सागर बिरदावडे याने ३८ धावांची खेळी केली. या आव्हानाला उत्तर देताना बॉश इलेव्हनचा डाव १११ धावांवर मर्यादित राहीला.

## हरियाना सलग दुसऱ्यांदा फायनलमध्ये





**नवी दिल्ली :** प्रो कबड्डीच्या ११व्या पर्वातील उपांत्यपूर्व फेरी शुक्रवारी पुण्यातील बालेवाडी स्टेडियममध्ये पार पडली. या फेरीतील सामन्याच्या अगदी अखेरच्या सेकंदाला राहुलने तीन खेळाडूंत गगन गौडाची अव्वल पकड करत प्रो-कबड्डी लीगच्या ११व्या पर्वातील संघर्षपूर्ण उपांत्य लढतीत हरियाना स्टिलर्सने यूपी योद्धाजचे आव्हान २८-२५ असे परतवून लावले. हरियाना स्टिलर्स संघाने सलग दुसऱ्या वर्षी अंतिम फेरीत प्रवेश केला. रविवारी होणाऱ्या अंतिम सामन्यात त्यांचा सामना माजी विजेत्या पाटणा पायरेट्स यांच्याशी होईल. चढाईपटू शिवम पठारेने महत्त्वाच्या क्षणी बदललेला गियर आणि उत्तरार्धात केलेल्या अचूक चढाया हरियाना स्टिलर्ससाठी निर्णायक ठरल्या. उत्तरार्धाच्या सुरुवातीलाच चढवलेला एक लोणही हरियानासाठी महत्त्वाचा ठरला. अखेरच्या पाच मिनिटांत यूपीच्या गगन गौडाने चांगल्या चढाया केल्या, पण त्याचीच पकड करत हरियानाने विजयावर शिक्कामोर्तब केले. यूपीच्या उंचपुऱ्या चढाईपटूंचा अभ्यास करून त्यांना पकडण्यापेक्षा तिसऱ्या चढाईत अडकवण्याचे नाही तर थेट बाहेर फेकून द्यायचे हरियानाचे नियोजनही जबरदस्त ठरले.

## झिम्बाब्वेची कसोटीमध्ये सर्वात मोठी धावसंख्या



**बुलवायो :** झिम्बाब्वे आणि अफगाणिस्तान यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना बुलावायो येथे खेळवला जात आहे. झिम्बाब्वेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि पहिल्या डावात त्यांच्या तीन फलंदाजांनी शतके झळकावली. या तीन फलंदाजांच्या शतकी खेळीच्या जोरावर झिम्बाब्वे क्रिकेट संघाने कसोटी क्रिकेटमध्ये नवा इतिहास लिहिला आहे. झिम्बाब्वे संघाने अफगाणिस्तानविरुद्ध पहिल्या डावात ५८६ धावांची विक्रमी धावसंख्या उभारली. झिम्बाब्वेची कसोटी क्रिकेटमधील ही सर्वोच्च सांघिक धावसंख्या आहे. यजमान झिम्बाब्वेकडून शॉन विल्यम्सने १७४ चेंडूत १० चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने १५४ धावा केल्या. विल्यम्सनंतर कर्णधार क्रेग इर्विनने १७६ चेंडूत १० चौकारांच्या मदतीने १०४ धावांची शतकी खेळी खेळली. या दोघांनंतर ब्रायन बेनेटनेही शानदार फलंदाजी केली. या सामन्यात ब्रायनने १२४ चेंडूत ५ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने ११० धावांची नाबाद खेळी केली. या तीन शतकांच्या जोरावर झिम्बाब्वे संघाने ५८६ धावांची मोठी धावसंख्या उभारली.

## क्रिशु नाईट्सचा ओडीएम ब्लास्टर्स भुवनेश्वरवर विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** क्रिककिंगडम यांच्या वतीने आयोजित तिसऱ्या क्रिककिंगडम चॅम्पियन्स करंडक १६ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत तरुण बेहेरा(नाबाद १२१)याने केलेल्या धडाकेबाज शतकी खेळीच्या जोरावर क्रिशु नाईट्स संघाने ओडीएम ब्लास्टर्स भुवनेश्वर संघाचा १९५ धावांनी धुव्वा उडवत आगेकूच केली.

शापूर्जी पालोनजी मैदान व वीरांगना क्रिकेट मैदान या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत प्रथम फलंदाजी करताना क्रिशु नाईट्स संघाने २५षटकात बिनबाद २७६धावा केल्या. यात तरुण बेहेराने अफलातून फटकेबाजी करत ५३ चेंडूत १५ चौकार व ४ षटकारासह नाबाद १२१ धावांची खेळी केली. त्याला प्रणव दवेने ५४ चेंडूत १० चौकार व २ षटकाराच्या मदतीने नाबाद ८१ धावा काढून साथ दिली. या जोडीने ९९ चेंडूत २५३ धावांची भागीदारी करून संघाच्या डावाला आकार दिला. याच्या उत्तरात ओडीएम ब्लास्टर्स भुवनेश्वर संघ १६.१ षटकात सर्व बाद ८१ धावावर संपुष्टात आला. यात

आयुश बरळ १४, आदर्शदित्य पाटी १० यांनी थोडासा प्रतिकार केला. क्रिशु नाईट्सकडून साईहरी वेंकटरमण(३-६), तरुण एस(२-२) यांनी सुरेख गोलंदाजी करत संघाला १९५ धावांनी विजय मिळवून दिला. दुसऱ्या लढतीत सौम्य सिंग(४-१४) याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर ओडीएम ग्लॅडिएटर्स रांची संघाने डीपीएस डायनामोज संघाचा ४ गडी राखून पराभव केला.



### ३८ वी राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरीता महाराष्ट्र राज्याच्या पुरुष व महिलांच्या संघ निवडी करीता

## छ. शिवाजी महाराज क्रीडा संकुलमध्ये सराव सुरु

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतीय हौशी कबड्डी फेडरेशनच्या मान्यतेने( हरिद्वार) उत्तराखंड येथे संपन्न होणाऱ्या ३८वी राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरीता महाराष्ट्र राज्याचा पुरुष व महिलांचा अंतिम संघ निवडण्यात येणार आहे. त्यासाठी शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे - बालेवाडी, बाणेर, पुणे येथे दिनांक २५/१२/२०२४ ते ०८/०१/२०२५ या कालावधी करीता महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाचे सराव शिबिर आयोजित करण्यात आलेले आहे.

या सराव शिबिरात विविध जिल्हयातील एकूण २७ पुरूष व २८ महिला खेळाडूंना संधी देण्यात आलेली असून महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाचे हे शिबिर शिवछत्रपती पुरस्कार विजेते आणि राष्ट्रीय प्रशिक्षक राजेश पाडावे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. येथे नमुद करण्यासारखी लक्षणीय बाब म्हणजे या सराव शिबिराच्या अंतिम दिवसापर्यंत आपली गुणवत्ता १००%सिध्द करु शकणाऱ्या पुरुष व महिला गटातील गुणवत्ता धारक खेळाडूंनाच महाराष्ट्र राज्य संघात प्रामुख्याने स्थान दिले जाणार आहे अशी माहिती महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सर कार्यवाहक बाबुराव चांदेरे सर यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने दिनांक २६/१२/२०२४ रोजी शासकीय औपचारीक पद्धतीने या महाराष्ट्र कबड्डी संघाच्या सराव शिबिराचे रीतसर उदघाटन करण्यात आले. त्या उदघाटन प्रसंगी महाराष्ट्र शासनाच्या युवक व क्रिडा संचनालयाचे सन्माननीय उपसंचालक सुहास पाटील यांची तेथे प्रमुख उपस्थिती लाभलेली होती. त्यांच्या सोबत महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन चे सरकार्यवाहक श्री. बाबुराव चांदेरे व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे राजेश ढमढेरे हे सुध्दा प्रामुख्याने तेथे उपस्थित होते.

पूर्वेकडील राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातही कबड्डी खेळाचा विकास व्हावा.हिमाचल प्रदेश, हरियाणा, दिल्ली,या सारख्या पुर्व विभागातील राज्या प्रमाणे महाराष्ट्राचे सुध्दा जास्तीत जास्त खेळाडू भारतीय संघात सहभागी व्हावेत. याकरिता महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन हे सातत्याने प्रयत्नशील राहिलेले आहे आणि राहील.

## पंजाबचा मुंबईवर दणदणीत विजय; प्रभसिमरनचे शतक

**नवी दिल्ली :** पंजाब संघाने विजय हजारे ट्रॉफीत मुंबईच्या संघावर शनिवारी दणदणीत विजय मिळवला. अर्शदीप सिंगने भेदक मारा करून



मुंबईची अवस्था ५ बाद २८ अशी केली होती. पण, अथर्व अंकोलेकर, शार्दूल ठाकूर व सूर्यांश शेडगे यांच्या फटकेबाजीने मुंबईला २४८ धावांपर्यंत पोहोचवले. पंजाबकडून सलामीवीर प्रभसिमरन सिंगने नाबाद १५० धावा केल्या आणि २९ षटकांत संघाचा ८ विकेट्स राखून विजय पक्का करून दिला. अंगकृष रघुवंशी ( १), आयूष म्हात्रे ( ७), हार्दिक तामोरे ( ०), कर्णधार श्रेयस ( १७), सूर्यकुमार यादव ( ०) व शिवम दुबे ( १७) हे अपयशी ठरल्याने मुंबईची अवस्था ६ बाद ६१ झाली होती. पण, अथर्व व सूर्यांश यांनी दमदार खेळी करून संघाला स्थिरावले. या दोघांनी सातव्या विकेटसाठी ६१ धावा जोडल्या. सूर्यांश ४३ चेंडूंत ४ चौकार व ३ षटकारांसह ४४ धावांवर बाद झाला. अथर्वने आठव्या विकेटसाठी शार्दूल ठाकूरसह ९३ धावा जोडल्या. शार्दूल ४५ चेंडूंत ४३ धावांवर बाद झाला. अथर्वने ८४ चेंडूंत २ चौकार व ३ षटकारांसह ६६ धावांचे योगदान दिले. हिमांशू सिंग ( १९) व रॉयस्टर डायस ( १८) यांनी सुरेख खेळ करून मुंबईला ४८.५ षटकांत २४८ धावांपर्यंत पोहोचवले.

## जीन्स घातली म्हणून विश्वविजेत्या मॅग्नस कार्लसनला केले स्पर्धेबाहेर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**न्यूयॉर्क :** न्यूयॉर्कमध्ये सुरू असलेल्या जागतिक रॅपिड आणि ब्लिट्झ बुद्धिबळ चॅम्पियनशिप स्पर्धेमधून विश्वविजेत्या मॅग्नस कार्लसनला बाहेर केले गेले आहे. कार्लसनने FIDE च्या ड्रेस कोडचे उल्लंघन केले. त्यानंतर कार्लसनला २०० युएस डॉलर्स दंडासह जीन्स बदलण्यासची सूचना देण्यात आली. पण कार्लसनने जीन्स बदलण्यास नकार दिल्यानंतर त्याला स्पर्धेतून बाहेर काढण्याची कारवाई करण्यात आली. दंडानंतर, मुख्य लवाद ॲलेक्स होलोझ्झकने कार्लसनला तातडीने पोशाख बदलण्यास सांगितले. तथापि, कार्लसनने नकार दिला आणि स्पर्धेच्या ९व्या फेरीतून तो अपात्र ठरला आहे.

आंतरराष्ट्रीय चेस फेडरेशनने ट्वीट करत या कारवाईबद्दल माहिती दिली आहे. यावेळी त्यांनी आणखी एका कारवाई बद्दल सांगितले. "याआधी, आणखी एक स्पर्धक, मिस्टर इयान नेपोम्नियाच्ची, याच्यावर स्पोर्ट्स शूज परिधान करून ड्रेस कोडचे उल्लंघन केल्याबद्दल दंड ठोठावण्यात आला. पण, मिस्टर नेपोम्नियाचीने नियमांचे पालन करत शूज बदलले आणि स्पर्धेत खेळणे सुरू ठेवले." "ड्रेस कोड नियम FIDE ॲथलीट्स कमिशनच्या सदस्यांद्वारे तयार केले जातात, जे व्यावसायिक खेळाडू आणि तज्ज्ञांनी बनलेले असतात. हे नियम वर्षानुवर्षे लागू आहेत आणि ते सर्व स्पर्धकांना लागू होतात.

## रोहितची कारकीर्द संपुष्टात येईल

**नवी दिल्ली :** गेल्या १४ डावांमध्ये रोहितने ११.०७ च्या सरासरीने केवळ १५५ धावा केल्या आहेत. दुसऱ्या आणि तिसऱ्या कसोटी सामन्यात सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करताना फ्लॉप झाल्यानंतर रोहित मेलबर्नमध्ये यशस्वी जैस्वालसोबत सलामीला आला, पण पहिल्या डावातही त्याची निराशा झाली. यानंतर तो सवालांच्या फेऱ्यात आला आहे.

तसेच माजी ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू केरी ओ'कीफे यांनेही रोहितच्या शॉटवर टीका केली. तो म्हणाला की, त्याच्या डावाच्या सुरुवातीला खेळणे खूप घाईचे होते. तो म्हणाला, 'रोहित शर्माची ही खरोखरच मोठी चूक होती. हा एक वाईट शॉट आहे. स्विव्हल-पुल हा रोहित शर्माच्या आवडत्या शॉट्सपैकी एक आहे.

## रेड्डीचं कुटुंब झालं भावुक! आईच्या डोळ्यातही आनंदाश्रू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मेलबर्न :** नितीश रेड्डीने २१व्या वर्षी ऑस्ट्रेलियाविरूद्ध कसोटी शतक झळकावत आपलं पहिलं आंतरराष्ट्रीय शतक केलं आहे. नितीश रेड्डीने फक्त त्याचे शतकच पूर्ण केले नाही तर त्याने मेलबर्न कसोटीत भारताचं आव्हान कायम ठेवलं आहे. नितीश रेड्डी १०५ धावा करत नाबाद परतला आहे. तर वॉशिंग्टन सुंदरबरोबर त्याने शतकी भागीदारी रचत भारताची धावसंख्या ३५८ वर नेली आहे. नितीश रेड्डीला आंतरराष्ट्रीय कसोटी खेळताना पाहण्यासाठी त्याचं संपूर्ण कुटुंब ऑस्ट्रेलियामध्ये आहे. त्याच्या या शतकानंतर त्याचे आई,वडिल आणि बहिण भावुक होत आनंद साजरा करताना दिसले.


नितीश रेड्डीच्या शतकाच्या वेळेस त्याचे वडिल आणि काक स्टेडियममध्ये उपस्थित होते. नितीशच्या प्रत्येक धावेवर त्याचे वडिल प्रार्थना करताना दिसले. नितीशने चौकार लगावत आपले शतक पूर्ण केले आणि त्याच्या वडिलांनी एकच जल्लोष केला आणि त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू तरळले.

## अग्रिमा राणा, अन्वी बारावकर, कायरा मदन यांची आगेकूच

**पुणे :** सुधांशु बॅडमिंटन अकादमी यांच्या वतीने आयोजित डेक्कन जिमखाना पुरस्कृत योनेक्स सनराईज एसबीए कप जिल्हास्तरीय सुपर १०० मानांकन बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत अग्रिमा राणा, अन्वी बारावकर, कायरा मदन यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली. डेक्कन जिमखाना बॅडमिंटन कोर्ट या ठिकाणी सुरु असलेल्या या स्पर्धेत ११ वर्षांखालील मुलींच्या गटात उपांत्यपूर्व फेरीत अव्वल मानांकित अग्रिमा राणाने सहाव्या मानांकित स्वरा कुलकर्णीचा १५-७, १५-७ असा तर पाचव्या मानांकित अन्वी बारावकरने अंशिका मोगलचा १५-३, १६-१४ असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली. दुसऱ्या मानांकित निधी गायकवाड हिने सातव्या मानांकित स्वरा पांडेचा १५-४, १५-८ असा पराभव केला. ११ वर्षांखालील मुलांच्या गटात अव्वल मानांकित अद्वैत फेरेने सिद्धांत धामवर १५-८, १५-६ असा विजय मिळवला.

## या वर्षाचा सायकलिंग खेळातील सर्वोच्च "जीवन गौरव" पुरस्काराने प्रताप जाधव सन्मानीत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** भारतामधील सायकलिंग क्षेत्रातील सर्वोच्च समजल्या जाणा-या "जीवन गौरव" पुरस्काराने महाराष्ट्राच्या श्री प्रताप जाधव यांना नवि दिल्ली येथे झालेल्या समरंभात सन्मानीत करण्यात आले. येथे झालेल्या एका समारंभात एशियन सायकलिंग कॉन्फडरेशन (एसीसी) चे महासचिव श्री ओंकार सिंग आणि नवी दिल्लीचे प्रसिद्ध हॉटेल व्यावसायीक आणि उद्योगपती श्री. गुरमीत सिंग यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. भारतामध्ये सायकलिंग खेळासाठी २५ वर्षाहुन अधिक काळ प्रेरणादाया योगदान देणा-या व्यक्तीस या पुरस्काराने गौरविण्यात येते.

श्री प्रताप जाधव यांनी १९७७ ते १९८७ दरम्यान खेळाडू म्हणून आपली कारकिर्द गाजवली. यात राष्ट्रीय रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेत सहा वेळा महाराष्ट्राचे प्रतिनीधीत्व केले. दोन वेळा राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत पदक विजेती कामगिरी केली. श्री जाधव यांनी दोन वेळा राज्य रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. त्यांनी भारताममधील सर्वात जुन्या व खडतर समजल्या जाणा-या मुंबई - पुणे सायकल स्पर्धेत सहा वेळी सहभाग घेतला असून रौप्यमहोत्सवी स्पर्धेचे उपविजेतेपद पटकावले आहे.

१९९३ पासून राज्य तसेच राष्ट्रीय सायकलिंग संघटनेत विविध पदावर काम केले आहे. श्री जाधव सध्या सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडीयाचे उपाध्यक्ष असून चार वर्षे ते सीएफआय चे खजिनदारही होते. संघटक म्हणून आपल्या ४० वर्षांच्या काळात श्री प्रताप जाधव यांनी २३ वेळा मुंबई - पुणे सायकल स्पर्धा, १५ वेळा एमटीबी, ४ वेळा रोड आणि एकदा ट्रॅक अशा २० राष्ट्रीय सायकलिं अजिंक्यपद स्पर्धा, १० वेळा राष्ट्रीय शालेय रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धांचे यशस्वी आयोजन केले.

### 'कोद्रे फार्म्स करंडक' १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब २५-२५ क्रिकेट स्पर्धा

## व्हिडीआर क्रिकेट, एके स्पोर्ट्स संघांचा डबल विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** ट्वेन्टीफोर स्पोर्टर्स मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'कोद्रे फार्म्स करंडक' १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब २५-२५ क्रिकेट स्पर्धेत व्हिडीआर क्रिकेट ॲकॅडमी आणि एके स्पोर्ट्स ॲकॅडमी संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून सलग दुसऱ्या विजयांची नोंद केली.

सिंहगड रोड येथील कोद्रे फार्म्स क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत जय मोहीते याने केलेल्या नाबाद ५२ धावांच्या जोरावर व्हिडीआर क्रिकेट ॲकॅडमीने क्षेत्रम ॲकॅडमीचा ८ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा खेळताना क्षेत्रम क्रिकेट ॲकॅडमीचा डाव ८२ धावांवर संपुष्टात आला. दक्ष दुसाने याने १७ धावा आणि दक्ष गित्ते याने ११ धावांचे योगदान दिले. हे लक्ष्य व्हिडीआर क्रिकेट ॲकॅडमीने ११.४ षटकात व २ गडी गमावून पूर्ण केले. जय मोहीते याने नाबाद ५२ धावा आणि सोहमराजे गोराडे याने १६ धावांची खेळी करून संघाला सहज विजय मिळवून दिला.

सोहम यादव याने केलेल्या फलंदाजीच्या जोरावर एके स्पोर्ट्स ॲकॅडमीने मॅव्हरीक्स् क्रिकेट ॲकॅडमीचा ७९ धावांनी पराभव करून सलग दुसरा विजय नोंदविला. पहिल्यांदा फलंदाजी करताना एके स्पोर्ट्स ॲकॅडमीने १८७ धावांचे लक्ष्य उभे केले. सोहम यादव याने नाबाद ६४ धावांची खेळी केली. याशिवाय अमन माने (४२ धावा) आणि रूद्र पाटील (२८ धावा) यांनीही धावांचे योगदान दिले. याला उत्तर देताना मॅव्हरीक्स् क्रिकेट ॲकॅडमीचा डाव १०८ धावांवर मर्यादित राहीला.